POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३२८ ● मुंबई, रविवार, २९ जून २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## ठाणे-भिवंडी-कल्याण भूमिगत मेट्रो... भिवंडी शहराच्या सर्वांगीण विकासाला गती

# नवीन उड्डाणपूल निर्मितीचा स्वतंत्र प्रकल्प राबवा : मुख्यमंत्री

### ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो मार्ग क्रमांक ५

- लांबी : एकूण ३४.२३ किमी. यात मेट्रो मार्ग –५ टप्पा १ (११.९० किमी), मेट्रो मार्ग –५ टप्पा २ (१०.५ किमी) आणि मेट्रो मार्ग –५अ (११.८३ किमी) यांचा समावेश आहे.
- स्थानके : १९ स्थानके (१ भूमिगत व उर्वरित उन्नत)
- ट्रेनची रचना : ६ डब्यांची ट्रेन.
- प्रस्तावित डेपो : काशेळी येथे (२६.९३ हेक्टर).
- इंटरचेंज स्थानके: कल्याण स्थानक (मेट्रो मार्ग १२ सह) आणि कापूरबावडी (मेट्रो मार्ग ४).

**प्रकल्पाची अंदाजित किंमत:**

- मेट्रो मार्ग ५ : ८,४१७ कोटी व मेट्रो मार्ग ५ अ: ४०६३ कोटी

**कामांची सद्यस्थिती व प्रकल्पातील टप्पे :**

टप्पा–१ (कापूरबावडी – धामणकर नाका) साठी ९६% काम पूर्ण झाले आहे.

- **मेट्रो मार्ग–५ टप्पा १ (ठाणेझधामणकर नाका)**
- लांबी : ११.९० किमी (६ उन्नत स्थानके).

काम प्रगतिपथावर आहे आणि ९६% स्थापत्य कामे पूर्ण झाली आहेत. सदर टप्पा मार्च २०२७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- **मेट्रो मार्ग - ५ टप्पा २ (धामणकर नाकाझदुगार्डी)**
- लांबी : अंदाजे १०.५० किमी.

या टप्प्यात ६ स्थानके असून त्यात १ भूमिगत व ५ उन्नत स्थानके आहेत .

**मेट्रो मार्ग ५ अ (दुगार्डी ते कल्याण आणि उल्हासनगर जोडणी)**

- लांबी : ११.८३ किमी

यात दुगार्डी ते कल्याण (६.५५७ किमी, ४ स्थानके) आणि उल्हासनगर जोडणी (५.२७२ किमी, ३ स्थानके) असे दोन कॉरिडॉर प्रस्तावित आहेत. सदर टप्प्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल अंतिम कार्यवाही सुरू आहे.

**■मुंबई । प्रतिनिधी :**

भिवंडी शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या परिवहन सेवेच्या गरजा भागविण्यासाठी कल्याण-भिवंडी मेट्रो लाईन प्रकल्प राबविण्यात येत आहे. भिवंडी शहरात वाढती लोकसंख्या, मालवाहतूकदारांची मोठी संख्या यामुळे कायमच वाहतूककोंडीचा सामना करावा लागतो. त्यामुळे येथील वाहतूककोंडीवर कायमस्वरूपी तोडगा निघण्याकरिता आणि शहराच्या सर्वांगीण, वेगवान पायाभूत विकासासाठी भूमिगत मेट्रोसह रस्ता रूंदीकरण व नवीन उड्डाणपूल निर्मितीचा स्वतंत्र प्रकल्प राबविण्याचा निर्णय ठाणे-कल्याण- भिवंडी मेट्रो मार्ग क्रमांक ५ च्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला.

पायाभूत सोयी सुविधांच्या प्रकल्पांमुळे भिवंडी शहराच्या विकासाला गती मिळणार असून या प्रकल्पांसाठी शासन निधी उपलब्ध करून देईल. भिवंडी शहरात मेट्रोच्या कामासोबतच रस्ता रूंदीकरण प्रकल्पाचे कामही सुरू करण्यात यावे. भिवंडी शहरातील नागरिकांची या प्रकल्पांच्या पूर्णत्वानंतर वाहतूककोंडीच्या समस्येतून कायमस्वरूपी सुटका होणार आहे, भिवंडीवासीयांसाठी मेट्रो प्रमाणेच रस्ता रुंदीकरण प्रकल्पही महत्त्वाचा आहे. त्यामुळे दोन्ही प्रकल्पांचे काम सोबतच सुरू करण्याच्या सूचना मुख्यमंत्री




देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

रस्ता रूंदीकरण प्रकल्प राबविल्यामुळे भिवंडी शहरातील उत्तर भागाचा सर्वांगीण विकास होणार असून या भागातील नागरिकांचे दळणवळण गतिमान होण्यास निश्चितच मदत होणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या मेट्रो लाइन-५ या प्रकल्पांच्या माध्यमातून ठाणे, भिवंडी, कल्याण, उल्हासनगर परिसरातील लाखो नागरिकांना जलद, सुरक्षित सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध होणार आहे. विकसनशील शहरे आणि औद्योगिक केंद्रे यांच्यासाठी सार्वजनिक वाहतूक व रस्ते ही दोन्ही माध्यमे परस्परपूरक असून त्यांची अंमलबजावणी समांतर पद्धतीने केल्यास विकासाची गती वाढेल. नागरिकांना अधिक फायदेशीर सेवा मिळू शकणार आहे.

या प्रकल्पांमुळे भिवंडी शहरातील दळणावळणाला गती येणार असल्याचे सांगत मुख्यमंत्री म्हणाले, या भागातील औद्योगिक विकासालाही चालना मिळणार आहे. या मेट्रो प्रकल्पाचा विस्तार आता कल्याणच्या पुढे उल्हासनगरपर्यंत होत आहे.

चिखलोली उपनगरीय रेल्वे स्थानकापर्यंत विस्तार करण्याबाबत अभ्यास करण्यात येत आहे. यामुळे अंबरनाथ, उल्हासनगर, शहाड आणि आजूबाजूच्या परिसरातील लाखो रहिवाशांना मुंबई आणि ठाणे या प्रमुख शहरी केंद्रांपर्यंतचा प्रवास अधिक जलद होणार आहे.


मुंबई महानगर प्रदेशमध्ये भिवंडी हे मालवाहतूकीचे विकासकेंद्र होत आहे. या शहराच्या विकासासाठी शासन कटीबद्ध आहे. शहरातील पायाभूत सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. शहरातील मेट्रो मार्गाच्या कामाबाबत आलेल्या लोकप्रतिनिधींच्या सूचनांचाही अंतर्भाव करण्यात यावा, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

मेट्रोचे काम करताना 'डीप टनेल' तंत्रज्ञान वापरून बोगदा तयार करण्याच्या कामाची पडताळणी करावी. तसेच दुहेरी बोगदा तंत्रज्ञान वापरून रस्ता व मेट्रो मार्ग तयार करण्याच्या कामाचाही अभ्यास करण्याचे निर्देश त्यांनी दिले. बैठकीला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, भिवंडी निजामपूर महानगरपालिका आयुक्त अमोल सागर, कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी उपस्थित होते.

## वाढवण बंदर व वडोदरा-मुंबई एक्स्प्रेसवेला उत्तन-विरार सागरी मार्ग जोडा : मुख्यमंत्री

### असा आहे प्रकल्प

- एकूण लांबी : ५५.१२ किमी
- मुख्य सागरी मार्ग: २४.३५ किमी
- कनेक्टर्स : ३०.७७ किमी
- उत्तन कनेक्टर (९.३२ किमी): बृहन्मुंबई महापालिकेच्या दहिसर-भाईंदर लिंक रोडशी जोड
- वसई कनेक्टर (२.५ किमी) : पूर्णपणे उन्नत




**■मुंबई । प्रतिनिधी :**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उत्तन-विरार सागरी मार्ग (यूव्हीएसएल) चा सुधारित आणि आर्थिकदृष्ट्या किफायतशीर प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सादर केला. यावेळी, प्रस्तावित उत्तन विरार मार्ग वाढवण बंदर व समृद्धी महामागार्ला जोडण्यात यावे. त्यामुळे हा सागरी मार्ग प्रकल्प मुंबईला महत्त्वाकांक्षी वाढवण बंदर प्रकल्पाशी जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा ठरणार आहे,असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

प्रस्तावित उत्तन-विरार सागरी मार्ग प्रकल्पाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानभवनातील मंत्रीमंडळ कक्षात झालेल्या बैठकीत आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल आदी उपस्थित होते. श्री. मुखर्जी यांनी सादरीकरणाद्वारे प्रकल्पाची माहिती दिली.

उत्तन-विरार सागरी मार्ग हा प्रकल्पाच्या विरार कनेक्टरमार्फत हा सेतू वडोदरा-मुंबई एक्स्प्रेसवेशी थेट जोडला जाणार आहे, ज्यामुळे उत्तर उपनगरांपासून पश्चिम किनारपट्टीपर्यंतचा मालवाहतूक व प्रवासी वाहतूक मार्ग अधिक जलद व कार्यक्षम होणार आहे. हा प्रकल्प केवळ आर्थिक संधीच निर्माण करणार नाही, तर भारताच्या बंदर आधारित विकास दृष्टिकोनाला महत्त्वाची साथ देणारा ठरणार आहे. हा प्रकल्प केवळ आर्थिक संधीच निर्माण करणार नाही, तर भारताच्या बंदर आधारित विकास दृष्टिकोनाला महत्त्वाची साथ देणारा ठरणार आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## मुंबई बॉम्बस्फोटातील दहशतवादी साकिब नाचनचा दिल्लीत मृत्यू



**■ठाणे । प्रतिनिधी :**

कुविख्यात दहशतवादी म्हणून ओळखला जाणारा साकिब नाचण याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. भिवंडी तालुक्यातील पडघा-बोरिवली हे साकिब नाचण याचं मूळगाव आहे. त्यानंतर, बोरिवली आणि पडघा या दोन्ही ठिकाणी २०० हून अधिक पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून गावात येणाऱ्या प्रत्येक वाहनांची तपासणी सुरू केली आहे. मुंबई सिरीयल बॉम्ब ब्लास्टमध्ये साकीब नाचन हा मुख्य आरोपी होता. त्यानंतर ककक मोड्युलमध्ये डिसेंबर २०२३मध्ये एनआयएने पुन्हा त्याला अटक केली होती. दिल्ली येथील तिहार जेलमध्ये ठेवण्यात आले होते. मात्र, तिथे ब्रेन स्टॉक आल्याने पुढील उपचारसाठी साबिकला दीनदयाल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. साकिब नाचन याचा मृतदेह भिवंडी येथील बोरवली गावात आणण्यात येणार आहे, त्यामुळे कोणताही कायदा सुव्यवस्था बिघडू नये यासाठी मोठा पोलीस फौजफाटा येथे तैनात करण्यात आला आहे.

भिवंडी नाशिक हायवेवर पडघा-बोरिवली गाव हे स्वतंत्र मुस्लिम बहुल राष्ट्र घोषित करण्यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून प्रयत्न सुरु असल्याचा धक्कादायक खुलासा राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या छाप्यातून समोर आला आहे. या गावाला सीरियासारख्या भूमीत रूपांतरित करण्याची योजना आखण्यात आल्याचं एनआएचं म्हणणं आहे आणि ही देशविघातक कृत्य कुठे सुरु आहे, तर भारताची आर्थिक आणि महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबई शहराच्या वेशीवर, अवघ्या 50 किमी अंतरावर. महाराष्ट्र आयसीसच्या दहशतवादी मॉड्यूलवर छाप्यादरम्यान एनआयएनं मोठ्या प्रमाणात बेहिशेबी रोकड, बंदुक, धारदार शस्त्रे, गुन्ह्याची कागदपत्रं, स्मार्टफोन आणि इतर डिजिटल उपकरणं जप्त केली आहेत. काही जणांना ताब्यात घेतलं आहे. यातलचं एक मुख्य नाव म्हणजे साकीब नाचन. जो गेल्यावेळी यंत्रणांच्या हाती लागला नव्हता. साकीब स्वतःला खलिफा म्हणजेच अल्लाहाचा उत्तराधिकारी समजत होता. त्याने पद्धतशीरपणे इसिसशी संबंधित एक-एक गोष्टी गेल्या अनेक वर्षांपासून करायला सुरुवात केली होती.

## २ दिवसाच्या स्त्री जातीच्या अर्भकाला आश्रम बाहेर सोडलं

## इंग्रजीमध्ये लिहिलेल्या चिठ्ठीने मन हेलावून टाकले

**■पनवेल । प्रतिनिधी :**

पनवेल शहरातील तक्का भागात असलेल्या स्वप्नालय आश्रमाच्या बाहेर आज (28 जून) सकाळच्या सुमारास दोन दिवसांचे स्त्री जातीचे अर्भक एका बास्केटमध्ये आढळले. त्याचबरोबर त्याच्याजवळ दूध पावडर, दूधाची बाटली आणि एक चिठ्ठीही ठेवण्यात आली होती. या बाळाच्या सोबत इंग्रजी भाषेत लिहिलेल्या चिठ्ठीने पनवेलकरांचे मन हेलावून टाकले आहे. बाळाला सांभाळण्यास आम्ही असमर्थ असल्याचे या चिठ्ठीतून पालकांनी म्हटले आहे. पनवेल पोलिसांना याची माहिती दिल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेत खाजगी रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर अर्भकाची प्रकृती ठीक असल्याचे सांगितले आहे. तर पोलीस या बालकाच्या पालकांचा शोध घेत आहेत. तक्का परिसरातील नागरिकांना एका बास्केटमधून बाळाच्या रडण्याचा आवाज आला. येथील नागरिकांनी आवाजाच्या दिशेने जाऊन पाहिले असता, त्यांना बास्केटमध्ये एक नवजात बाळ दिसले. नागरिकांनी क्षणाचाही विलंब न लावता तत्काळ पनवेल शहर पोलिसांना या घटनेची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी बाळाला ताब्यात घेऊन उपचारासाठी पनवेलच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. सध्या बाळाची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे. या चिठ्ठीतून बाळाच्या पालकांची बिकट मानसिक आणि आर्थिक परिस्थिती समोर आली आहे. मात्र, अशा प्रकारे बाळाला सोडून देणे



हा गंभीर गुन्हा असल्याने, पनवेल शहर पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. बाळाच्या पालकांचा शोध घेण्यासाठी तपास सुरू करण्यात आला असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**चिठ्ठीतील मजकुराने मन हेलावले**

चिठ्ठीत लिहिण्यात आले होते की, आम्हाला हे करावे लागले यासाठी आम्ही मनापासून माफी मागतो. आमच्याकडे दुसरा कोणताही पर्याय नव्हता. आम्ही या बाळासाठी मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या काहीही करू शकत नाही. कृपया या प्रकरणात कोणालाही गुंतवू नका किंवा प्रकरण वाढवू नका. आम्हाला जे काही सहन करावे लागत आहे, ते या बाळाच्या नशिबी येऊ नये अशी आमची इच्छा आहे. आम्ही तुम्हाला विनंती करतो की, तिची काळजी घ्या. आशा आहे की एक दिवस आम्ही तिला परत घेऊ. कारण आम्ही तिच्या जवळच आहोत. आम्ही दिलगीर आहोत.

**मुलीच्या भवितव्यासाठी योग्य पावले उचलू : आमदार ठाकूर**

सर्व देशवासीयांच्या दृष्टिकोनातून अतिशय चिंताजनक आणि हृदयद्रावक अशी ही घटना आहे. या बाळाच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून व्यक्तिशः मी आणि आमचे सर्व सहकारी जी काही आर्थिक बाजू उचलायची आहे ती आम्ही नक्कीच उचलू. तसेच या संदर्भामध्ये मी पोलिसांशी समन्वय करणार असून या बाळाचा सांभाळ, उपचार करण्याच्या दृष्टिकोनातून जे काही आमच्याकडून करता येईल, ते मी करेन. या मुलीच्या भवितव्याच्या अनुषंगाने योग्य ती पावले उचलली जातील, अशी प्रतिक्रिया पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली.

## विहिरीच्या काठावर मुलीची ओढणी दिसली

## पिंपरीत पोलिसांनी ४५ फूट खोल अंडरवॉटर कॅमेरा सोडला अन्...

**■पिंपरी । प्रतिनिधी :**

पिंपरी-चिंचवड शहरातील चऱ्होली परिसरात धक्कादायक घटना समोर आली आहे. चोविसावाडीत गुरुवारी, २६ जून रोजी सकाळी एका विहिरीत १८ वर्षीय वैष्णवी संतोष इंगवले या तरुणीचा मृतदेह आढळून आला.

गेल्या काही दिवसांपासून तरुणी बेपत्ता होती. अखेर दुर्दैवीरित्या तिचा मृतदेह विहिरत आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. तरुणीच्या जाण्याने कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

**विहिरीच्या काठावर ओढणी आढळली आणि संशय बळावला**

पोलिसांकडून तपास सुरू असताना चोविसावाडीतील घटनास्थळाजवळील विहिरीच्या काठावर वैष्णवीची ओढणी आढळली. तरुणीची ओढणी आढळल्यानंतर पोलिसांचा संशय बळावला. यानंतर तात्काळ अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आलं.

**अंडरवॉटर कॅमेरा विहिरीत टाकला, तळाशी मृतदेह दिसला**

पुढे ४५ फूट खोल विहिरीत अंडरवॉटर कॅमेरा टाकून शोधमोहीम राबवण्यात आली. काही वेळातच कॅमेऱ्यात वैष्णवीचा मृतदेह दिसून आला. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. वैष्णवीने आत्महत्या का केली, याबाबत तिच्या कुटुंबीयांकडून कोणतीही ठोस माहिती मिळालेली नाही.

वैष्णवीच्या कुटुंबीयांनी २५ जून रोजी दिघी पोलीस ठाण्यात मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली होती. त्यानंतर पोलिसांकडून तरुणीचा शोध सुरु होता. अखेर २६ जूनला ती विहिरीत तळाशी मृतावस्थेत आढळली. प्राथमिक तपासात पोलिसांनी आत्महत्येचा संशय व्यक्त केला असून यामागील नेमकं कारण अद्याप अस्पष्ट आहे.



## पोलिसांच्या नाकावर टिच्चून अहिल्यानगरमध्ये दोन वर्ष बांगलादेशींचं वास्तव्य

**■अहिल्यानगर । प्रतिनिधी :**

अहिल्यानगर दक्षिण कमांड मिलीटरी इंटेलिजेंस यांच्या गुप्त बातमीद्वारे अहिल्यानगरच्या एमआयडी पोलिसांनी कारवाई करत पोखर्डी शिवारातून तीन बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतलं आहे. मागील दोन वर्षांपासून हे बांगलादेशी अवैधरित्या अहिल्यानगरमध्ये राहत होते. जहांगिर अबुताहेर शेख (रा. चातपुर ठाणा हजीगंज, राज्य चेटोग्राम, बांगलादेश), हनीफ अब्दुल खलीद शेख (रा. खजीर खाली थाना शेनवाग पोस्टे शेबरहाट बांगलादेश) आणि मश्रफ हबीब शेख (रा. चातपुर ठाणा हजीगंज, राज्य चेटोग्राम, बांगलादेश) अशी ताब्यात घेण्यात आलेल्या बांग्लादेशी नागरिकांची नाव आहेत.

कुठलाही व्हिजा अथवा परवानगी नसताना विनापरवाना घुसखोरी करुन



पोखर्डी शिवारात राहत होते, अशी गोपनिय माहिती मिळाल्याने एमआडीसी पोलीस स्टेशनचे दहशतवाद विरोधी पथकातील अधिकारी आणि अमंलदार यांनी स्वतः जावून खात्री केली. यावेळी पोखर्डी शिवारात एका खडी क्रेशर-वर तिन संशयित इसम मिळून आले. त्यांची विचारपूस केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.

**एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल**

त्यांच्याकडे कुठलीही परवानगी अथवा परवानगीची कागदपत्रे मळून आली नाही. त्यांच्याकडे बनावट आधारकार्ड, पॅनकार्ड आणि इतर बनावट कागदपत्रे मिळून आली असून ती जप्त करण्यात आली आहे. सदर बांगलादेशी नागरिकांवर एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करून पुढील कारवाई सुरू आहे. सदर कारवाईमध्ये सदन कमांड मिलीटरी इन्टेलिजन्स अहिल्यानगर यांची मदत घेण्यात आली.

**गुप्तचर यंत्रणा करतेय काय?**

दरम्यान, संबंधित व्यक्तींचा एखाद्या देशविरोधी कारवाईत सहभागी आहे का? यांच्यासह इतर काही लोक अवैधरित्या घुसखोरी करून अहिल्यानगर किंवा महाराष्ट्रात राहत आहेत का? याची चौकशी सुरू करण्यात आली आहे. मात्र, एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांच्या नाकावर टिच्चून दोन वर्षे बांग्लादेशी अवैधरीत्या वास्तव्यास होते. पोलिसांची गुप्तचर यंत्रणा करतेय काय? असा सवाल उपस्थित होत असून थेट मिलीटरी इन्टेलिजन्सने माहिती कळवल्यानंतर कारवाई झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.




संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## क्षेपणास्त्रे म्यान... चिंता कायम

दोन्ही बाजूंनी होणारा क्षेपणास्त्रांचा वर्षाव आणि त्यात अमेरिकेसारख्या महासत्तेच्या सक्रिय सहभागाने इराण-इस्त्रायल युद्धाचा भडका वाढण्याची चिंता व्यक्त होऊ लागली असतानाच अचानक युद्धविरामाची घोषणा झाल्याने साऱ्या जगाने सुटकेचा निःश्वास टाकला आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्षात मध्यस्थीचा दावा करणारे अमेरिकेचे अध्यक्ष आणि स्वयंघोषित शांतिदूत डोनाल्ड ट्रम्प यांनी या युद्धात प्रथम उडी घेतली आणि नंतर इराणच्या प्रत्युत्तरानंतर ते थांबविल्याची घोषणाही केली. युद्धविरामाच्या त्यांच्या घोषणेनंतरही हल्ले सुरूच राहिले; त्यावर त्यांनी इराण व इस्त्रायल यांच्या नावाने आगपाखडही केली. या संघर्षात सध्या तरी शांतता निर्माण झाल्याचे दिसत असले, तरी या बारा दिवसांच्या लढाईतून कोणी काय साध्य केले, हे स्पष्ट झालेले नाही. त्यामुळेच ही अनिर्णित अवस्था किती काळ टिकणार, याबाबत साशंकता आहे. दोन्ही बाजूंनी क्षेपणास्त्रांचा मारा थांबला असला, तरी त्यांचा वर्षाव पुन्हा सुरू होण्याची चिंता कायम आहे. गाझा पट्टीमध्ये इस्त्रायलचे हल्ले सुरू असतानाच हेजबुल्लाह आणि हुती बंडखोर यांच्याकडून होत असलेल्या प्रतिहल्ल्यांना इराणचे पाठबळ असल्याचे दिसून आल्याने इराण व इस्त्रायलच्या संबंधांमधील कडवटपणा दिवसेंदिवस वाढत होता. त्यात काही दिवसांपूर्वी इराणच्या युरेनियम संवर्धन कार्यक्रमांमुळे आंतरराष्ट्रीय कराराचे उल्लंघन होत असल्याचा आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संघटनेचा अहवाल समोर आला. लगोलग दुसऱ्या दिवशी इस्त्रायलने 'ऑपरेशन रायझिंग लायन'द्वारे इराणमधील अणुसंशोधन केंद्रे आणि लष्करी तळांवर हल्ले सुरू केले. त्यामध्ये इराणच्या काही वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना लक्ष्य करण्यात आले. इराणनेही तेल अवीवसह इस्त्रायलमधील अन्य शहरांवर क्षेपणास्त्रे डागून त्याला प्रत्युत्तर दिले. याच काळात ट्रम्प हे 'जी ७' गटाची बैठक सोडून तातडीने मायदेशी रवाना झाले, तेव्हापासून अमेरिका काय करणार, याकडे साऱ्या जगाचे लक्ष होते. चार दिवसांपूर्वी अमेरिकाही या संघर्षात उतरली आणि इराणच्या तीन अणुसंशोधन केंद्रांवर जोरदार हल्ले चढविण्यात आले. प्रत्युत्तरादाखल इराणने कतारमधील अमेरिकेच्या लष्करी तळाला लक्ष्य केले. अमेरिकेच्या युद्धप्रवेशाने या युद्धाची व्याप्ती किती वाढणार आणि तिसरे महायुद्ध सुरू होणार का, अशा चर्चा जगभरात सुरू झाल्या. मात्र, इराणला नेस्तनाबूत करण्याची भाषा बोलणारे ट्रम्प इराणने केलेले प्रतिहल्ले पाहून शांतिदूताच्या भूमिकेत शिरले आणि इराण-इस्त्रायलमध्ये युद्धबंदीची घोषणा केली. ती प्रथम इराणने धुडकावली आणि इस्त्रायलवर हल्ले चढविले; मग इस्त्रायलनेही प्रत्युत्तर दिले. आपल्या घोषणेकडे इस्त्रायल सोयीस्कर दुर्लक्ष करीत असल्याचे पाहून 'शांतिदूत' ट्रम्प संतापले. त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. अखेर युद्धविराम झाल्यानंतर दोन्ही आघाड्यांवर शांतता असली, तरी या शस्त्रसंधीमागील कारणे आणि या देशांनी काय साध्य केले, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. अण्वस्त्रे बनविण्याची इराणची क्षमता नष्ट केल्याचा दावा अमेरिका आणि इस्त्रायल यांनी केला असला, तरी याबाबत उलटसुलट दावे करण्यात येत आहेत. अर्थात, या घटनाक्रमामुळे इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाला काही काळापुरती तरी खीळ बसली, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. दुसरीकडे इराणच्या संसदेने प्रत्युत्तरादाखल होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा निर्णय घेतल्यामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळित होण्याची चिंता साऱ्या जगाला सतावत होती. तेलपुरवठ्याची कोंडी झाल्यास जगभरात तेलाच्या किमती भडकण्याचा धोका होता. दुसरीकडे रशियाने इराणला पाठिंबा देऊन मदतीची तयारीही दर्शवली होती, तसेच गेल्या काही काळातील चीन व इराण यांच्यातील वाढती जवळीक पाहता चीनची भूमिकाही कळीची ठरण्याची शक्यता होती. आपला सर्वांत मोठा तेल पुरवठादार, व्यापारातील मोठा भागीदार आणि आंतरखंडीय रेल्वे प्रकल्पातील सहकारी असलेल्या इराणसाठी धावून येणे चीनच्या उद्दिष्टांशी सुसंगत होते. अशी अनेक धोके प्रसवणारी अस्थिरता कोणालाच परवडणारी नाही. ट्रम्प यांच्या आक्रमक भूमिकेबाबत अमेरिकेत आणि बेंजामिन नेतान्याहू यांच्या युद्धखोर भूमिकेबाबत इस्त्रायली नागरिकांमध्येही विरोधाचा सूर उमटतो आहे. त्या पार्श्वभूमीवर 'इराणची अण्वस्त्रे बनविण्याची क्षमता नष्ट करण्याचे उद्दिष्ट साध्य केले,' असा दावा करून इस्त्रायल; तर 'इस्त्रायल आणि अमेरिकेलाही चोख प्रत्युत्तर दिले,' असा दावा करून इराण युद्धविरामापर्यंत आलेले दिसतात. जो धोका वारंवार आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर मांडून दोन देशांनी इराणशी युद्ध केले, त्या इराणचा अणुकार्यक्रम तात्पुरता खंडित होणार, की इराण अधिक वेगाने अण्वस्त्रसज्जतेकडे वाटचाल करणार, हा मोठा प्रश्न आहे. त्याबरोबरच युद्धपश्चात कोणती नवी भू-राजकीय समीकरणे उदयाला येणार, यावर तेथील शांतता किती काळ टिकेल, हे अवलंबून आहे.

## शक्तिपीठला अर्थशक्ती, पण शेतकऱ्यांच्या विरोधाचे काय?







शक्तिपीठ महामार्ग हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट मानला जातो. मात्र, या महामार्गाची घोषणा झाल्यापासून शक्तिपीठ महामार्ग वादाच्या केंद्रस्थानी राहिलाय. भूसंपादनाच्या मुद्द्यावरून प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा शक्तिपीठला तीव्र विरोध आहे. महामार्गासाठी निधीच्या तरतुदीचा प्रस्ताव समोर येताच मंत्रिमंडळ बैठकीतही त्याचे पडसाद उमटले. शिवाय शेतकऱ्यांनी याप्रश्नी पुन्हा एल्गार पुकारलाय. शक्तिपीठला दिलेल्या अर्थशक्तीतून कुठल्याही प्रकारे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्णत्वास न्यायचा, असा निर्धार यातून दिसतोय. पण त्याआधी शेतर्कयांचा विरोध शमवण्याचं मोठं आव्हान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांपुढं असेल.

शक्तिपीठ महामार्गाला गती देण्यासाठी २० हजार ७८७ कोटी रुपयांच्या तरतुदीस मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आलीय. महामार्गासाठी निधीची तरतूद होते न होते तोच दुसऱ्या दिवशी जमिनीच्या मोजणीवरून धाराशिवमध्ये शेतकरी-पोलिसांमध्ये झटापट झाली.

तुळजापूर तालुक्यातील वाणेवाडी शिवारात महसूल विभागाचे कर्मचारी संयुक्त जमीन मोजणीसाठी आले असता, वाणेवाडीसह शेळगाव, खुंटेवाडी, काटी, रुई आदी गावच्या शेतकऱ्यांनी जमीन मोजणीस विरोध करीत शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, अशी मागणी लावून धरली. विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेताच शेतकरी व पोलिसांमध्ये जुंपली. अखेर शेतकऱ्यांचा रोष वाढत असल्याचं पाहून महसूल अधिकारी, कर्मचाऱ्यांना जमीन मोजणी न करताच काढता पाय घ्यावा लागला.

खुंटेवाडी, काटी गावच्या शिवारातून याआधीच सूरत-चेन्नई राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. या महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित झाल्या आहेत. आता पुन्हा शक्तिपीठ मार्गासाठी जमीन घेतल्यास शेतकऱ्यांकडील जमिनीचं क्षेत्र आणखी कमी होईल. शिवारातील अनेक शेतकरी भूमिहीन होऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ येईल, अशी भीती इथले शेतकरी व्यक्त करतात. ज्यात तथ्यही आहे.

राज्याच्या पूर्वेकडील पवनार (जि. वर्धा) इथून सुरू होऊन पश्चिमेकडील पत्रादेवी (जि. सिंधुदुर्ग) या महाराष्ट्र-गोवा सीमेपर्यंत जाणारा ८०२.५९२ किलोमीटर लांबीचा हा महामार्ग आहे. वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर व सिंधुदुर्ग अशा १२ जिल्ह्यांना हा महामार्ग जोडतो.

या महामार्गाच्या माध्यमातून राज्यातील प्रमुख शक्तिपीठे माहुर, तुळजापूर व कोल्हापूर तसेच अंबेजोगाई ही तीर्थक्षेत्रं तसंच संतांची कर्मभूमी असलेले मराठीचे आद्यकवी अंबेजोगाईस्थित मुकूंदराज स्वामी, जोगाई देवी तसेच १२ ज्योतिर्लिंगांपैकी २ औंढानागनाथ व परळी वैजनाथ, महाराष्ट्राचे आराध्य पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, यासह कारंजा-लाड, अक्कलकोट, गाणगापूर, नरसोबाची वाडी, औदुंबर ही दत्तगुरूंची धार्मिक स्थळे जोडणं ही प्रमुख संकल्पना यामागं आहे. या महामार्गामुळं नागपूर ते गोवा हे १८ तासांच्या प्रवासाचं अंतर ८ तासांवर येईल, असंही म्हटलं जात आहे.

परंतु तब्बल ८६ हजार कोटी रुपयांच्या या प्रकल्पासाठी ८४०० हेक्टर जमिनीच्या भूसंपादनाची गरज आहे. यातील ८१०० हेक्टर म्हणजेच ९५ टक्क्यांहून अधिक जमीन शेतकऱ्यांकडून संपादित करायची आहे. हेच सरकारपुढील मुख्य आव्हान आहे.

पहिल्या महायुती सरकारच्या काळात जमीन अधिग्रहणासाठी अधिसूचना जारी करण्यात आली होती. ज्या शेतकऱ्यांची जमीन संपादित केली जाणार आहे, त्यांना सरकारने नोटिसा पाठवल्या होत्या. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्यातील असंख्य शेतकरी आधीच जमिनीच्या छोट्याशा तुकड्यावर गुजराण करत आहेत. बहुतांश शेतकऱ्यांकडे उपजीविकेसाठी पैसे कमवण्याचं इतर कुठलंही साधन नाही.

भूसंपादनाच्या प्रक्रियेनंतर ते केवळ भूमिहीनच होणार नाहीत, तर त्यांचं जगणंही कठीण होऊन जाईल. काही शेतकऱ्यांच्या मते, राज्य सरकार देऊ करत असलेला मोबदला अत्यंत तुटपुंजा आहे. तर काही शेतकरी कितीही मोबदला दिला तरी, त्यांची जमीन देण्यास तयार नाहीत. कारण जमीन हातची गेल्यास शेती करायला आणि कुटुंबाचं पालनपोषण करायला हाती काहीच उरणार नाही, असं त्यांना वाटत आहे.

कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील शेतकरी आणि शेतकरी संघटनांचाच शक्तिपीठ महामार्गाला विरोध नसून सत्ताधारी महायुतीच्या नेत्यांकडूनसुद्धा शक्तिपीठ महामार्गाला कडाडून विरोध होतोय. कोल्हापूरच्या कागल मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री हसन मुश्रीफ, कोल्हापूरचे पालकमंत्री व शिवसेनेचे मंत्री प्रकाश आबिटकर, भाजप नेते समरसिंह घाटगे यांनीही महामार्ग रद्द करावा अशी मागणी केली आहे.

तर, दुसरीकडे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी, कोल्हापूरमधील काँग्रेस नेते सतेज पाटीलसुद्धा शक्तिपीठ महामार्गाला विरोध करत शेतकऱ्यांच्या आंदोलनात उतरले आहेत. शक्तिपीठ महामार्ग केवळ कंत्राटदार आणि महायुती सरकारमधील काही नेत्यांच्या फायद्यासाठी बांधला जात असल्याचा त्यांचा आरोप आहे. प्रकल्प जाहीर होण्याआधीच नेतेमंडळी आणि काही नोकरशहांनी इथल्या जमिनी खरेदीचा प्रयत्न केल्याचंही म्हटलं जात होतं. मात्र, हा सर्व विरोध डावलून महामार्गाच्या भूसंपादनासाठी अधिसूचना जारी करण्यात आली होती.

कोल्हापूर जिल्ह्यातील तब्बल ५९ गावे शक्तिपीठ महामार्गात बाधित होणार आहेत. यामध्ये सर्वाधिक भूदरगड तालुक्यातील २१ गावांचा समावेश आहे. त्या खालोखाल कागल तालुक्यातील १३ गावांचा समावेश आहे. करवीर तालुक्यातील १० गावांचा समावेश आहे. शिरोळ, आजरा, हातकणंगले तालुक्यामधील ५ गावांचा समावेश आहे. नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीआधी कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी महामार्गाला तीव्र विरोध करत आंदोलन केलं होतं.

त्यावेळी निवडणुकीत फटका बसू नये म्हणून तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सावध भूमिका घेत महामार्गात बदल करण्याचं आश्वासन दिलं होतं. सोबतच शिरोळ, करवीर, हातकणंगले, कागल, भुदरगड आणि आजरा तालुक्यातील भूसंपादनाची अधिसूचना रद्द करण्याचाही निर्णय घेतला होता. परंतु मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नवीन महायुती सरकार स्थापन होताच त्यांनी आपला महत्त्वाकांक्षी प्रकल्प कुठल्याही प्रकारे पूर्णत्वास नेण्याचा चंग बांधलाय.

समृद्धी महामार्गालाही सुरूवातीला विरोध होत होता. मात्र त्याची उपयुक्तता सिद्ध होताच हा विरोध मावळला. राज्य सरकारनं शेतकऱ्यांना जमिनीच्या बाजारभावापेक्षा अधिक किमतीनं पैसे दिले. शेतकऱ्यांनी त्या पैशातून अन्य ठिकाणी जमिनी विकत घेतल्या. तर, काहींनी व्यवसायात पैसे टाकले. परंतु या महामार्गाला काही शेतकऱ्यांचा अजूनही विरोध आहे, तिथले स्थानिक लोकप्रतिनिधी त्या शेतकऱ्यांशी चर्चा करतील. कोणावर जबरदस्ती होणार नाही किंवा अन्याय होणार नाही, अशी भूमिका आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नव्यानं मांडताना दिसताहेत.

शेतकऱ्यांच्या विरोधानंतरही मागच्या विधानसभा निवडणुकीत कसाबसा विजय मिळाला. परंतु शक्तिपीठवरून शेतकऱ्यांचा विरोध न मावळल्यास राजकीयदृष्ट्या अडचणीचं ठरेल, असं मत मंत्री हसन मुश्रीफ आणि प्रकाश आबिटकर दोघांनी मंत्रिमंडळ बैठकीत मांडलं. लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. अशा वेळी शेतकरी-मतदारांना दुखावणं धोक्याचं ठरू शकेल याची सरकारलाही जाणीव आहे.

त्यामुळंच पवनारपासून ते कोल्हापूरपर्यंतच्या महामार्गाला मंत्रिमंडळ बैठकीत हिरवा कंदील मिळालेला असला तरी, कोल्हापूर ते पत्रादेवीदरम्यानच्या मार्गावर अजूनही प्रश्नचिन्ह कायम असल्याचं समजतं. कोल्हापुरातील रद्द केलेली भूसंपादनाची अधिसूचना पुन्हा काढण्याआधी स्थानिक शेतकऱ्यांसोबत चर्चा करून तोडगा काढणं व तोपर्यंत वर्धा ते सांगलीपर्यंत भूसंपादन पूर्ण करण्यावर राज्य सरकार भर देण्याची शक्यता आहे.

कोल्हापुरातील शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी सरकारचे प्रतिनिधी जमीन मोजणीसाठी आल्यास हातात गोफण आणि दगड घेऊन तयार राहण्यास शेतकऱ्यांना सांगितलं आहे. तर, कोल्हापूर, सांगली, धाराशिव आदी जिल्ह्यातील काँग्रेस नेतेही शक्तिपीठला विरोध करत शेतकऱ्यांच्या बाजूनं रस्त्यावर उतरण्याची तयारी करत आहेत. कोणताही सरकारी अधिकारी जमिनीचे सर्वेक्षण करण्यासाठी आल्यास आम्ही त्याला सोडणार नाही, अशी आक्रमक भूमिका काही शेतकऱ्यांनी घेतलीय.

याआधी शेतकऱ्यांचा विरोध मावळावा म्हणून केवळ शक्तिपीठला समर्थन देणाऱ्या आमदारांना पुढं करण्याचा फार्म्युला राज्य सरकार अवलंबत होतं. पण हा महामार्ग खरोखरच पूर्णत्वास न्यायचा असेल तर शेतकऱ्यांचं समाधान करण्याचं आव्हान सरकारला पेलावं लागेल. शक्तिपीठला अर्थशक्ती मिळाली खरी, परंतु जनशक्ती अर्थात शेतकऱ्यांच्या पाठिंबा मिळाल्याशिवाय यातून तोडगा निघणार नाही हे स्पष्ट आहे.

## पटसंख्या घटली... जबाबदार कोण?

शिक्षकभरती नाही. त्यांचा शाळाबाह्य कामांत जाणारा वेळ कमी होत नाही. शिक्षण विभागात भ्रष्टाचार वाढल्याने नैतिक धाक संपला आहे. पूर्ण संख्येने अधिकारी नेमून प्रभावी शाळाभेटी झाल्या तरच पटसंख्या वाढेल. शिक्षकांची जबाबदारी मान्य केली तरी सरकार आवश्यक गोष्टी करत नाही, याचे काय करायचे? सरकारवर काय कारवाई करायची



माध्यमात एकाच वेळी दोन बातम्या आल्या. पहिली, वारे गुरुजींची जिल्हा परिषद शाळा जगातील १० शाळांत निवडली गेली. या शाळेचा पट चार वर्षांत तीनवरून १२० झाला आणि दुसरी, पटसंख्या खूप कमी झाली म्हणून बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ३५ शाळांतील शिक्षक निलंबित केले. पटसंख्या घसरण्याची जबाबदारी शिक्षकांवर निश्चित केली. पटसंख्येबाबत शिक्षकांना जबाबदार धरणे योग्य आहे का? नसेल तर पटसंख्या कमी होण्यास कोणाला जबाबदार धरायचे?

शिक्षक पूर्ण जबाबदार किंवा शिक्षक अजिबात जबाबदार नाहीत, हे दोन्हीही दृष्टिकोन टोकाचे आहेत. शिक्षकांची जबाबदारी नक्कीच आहे. बुलढाण्यात सागवान गावात पहिली ते सातवीपर्यंत ७७ विद्यार्थी शाळेत होते, आज चार उरलेत. याबाबत शिक्षकांना जबाबदार धरावेच लागेल. तुलना चुकीची वाटेल, पण एखाद्या कंपनीत सेल कमी झाला तर विक्री करणाऱ्या विभागाला जाब विचारतात. त्याप्रमाणे शिक्षकांची जबाबदारी वजा करून या विषयाची चर्चा होऊ शकत नाही. सागवान गावात मी फोन करून माहिती घेतली तेव्हा शिक्षकांविषयी गावात तीव्र नाराजी दिसली. अध्यापन दर्जा, शिक्षकांतील वादविवाद, सतत मोबाइलचा वापर ही कारणे सांगितली गेली. इथे इंग्रजी शाळा हा मुद्दा नाही, तर शिक्षकांमुळे विद्यार्थी दुसऱ्या मराठी माध्यमिक शाळेत गेले. अनेकदा अशा शाळेतील ज्येष्ठ शिक्षक पट कमी झाला तर आपली नोकरी जाणार नाही, अशा बेफिकिरीत असतात. त्यामुळे शिक्षकांना पट कमी होण्याबद्दल विचारणा करणे योग्य आहे. हे शिक्षक गावात राहत नसल्याने गावाशी नाते राहिले नाही, हे सर्वांत महत्त्वाचे कारण आहे.

मात्र, पटसंख्या कमी होण्यासाठी केवळ शिक्षकांनाच जबाबदार धरणे योग्य ठरणार नाही. शिक्षणविषयक धोरणे, प्रशासन याचाही परिणाम होत असतो. महाराष्ट्रात सरकारी शाळांना स्पर्धा नको म्हणून अनुदानित खासगी मराठी शाळांना परवानगी दिली नाही, मात्र विनाअनुदानित इंग्रजी शाळांना मोठ्या संख्येने परवानगी दिली गेली. याचा परिणाम म्हणून आज मुंबईपासून खेड्यापर्यंत इंग्रजी शाळा निघाल्या.आज राज्यात १२,६७० खासगी इंग्रजी शाळा आहेत. मुंबई आणि मोठ्या शहरांत पालकांना मराठी शाळेत मुले टाकावी वाटली तरी आजूबाजूला मराठी शाळाच नाहीत, असे चित्र आहे. खासगी अनुदानित प्राथमिक शाळा सुरू करायला प्रोत्साहन दिले असते तर मराठीतून शिकणारा पट वाढला असता व सरकारी शाळा व खासगी मराठी शाळांमध्येच स्पर्धा निर्माण होऊन उपक्रमांची देवघेव झाली असती.

एकीकडे सरकारी शाळांचे पट घसरत असताना 'नामवंत शाळा' ही योजना आणली आहे. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी शाळेत प्रवेश घेण्यासाठी सरकार प्रत्येक विद्यार्थ्याची ७० हजार रु. फी भरते आहे. आज राज्यातील ४३ हजार ७७६ विद्यार्थी जिल्हा परिषद मराठी शाळा सोडून इंग्रजी शाळेत गेले आहेत आणि ह्यनामवंत शाळेह्णच्या व्याख्येत मराठी शाळा नाहीत. सरकार जर आपल्याच मराठी शाळेला नामवंत म्हणणार नसेल आणि इंग्रजी शाळांना अशी आर्थिक मदत करणार असेल तर मराठी शाळांचे पट वाढणार कसे? धनगर विद्यार्थ्यांसाठीही नामवंत योजना मुख्यमंत्र्यांनी जाहीर केली, म्हणजे आणखी विद्यार्थी कमी होतील. खरे तर ही रक्कम इंग्रजी शाळांना देण्यापेक्षा आदिवासी आश्रमशाळा सुधारण्यासाठी ती वापरता आली असती.

शिक्षण हक्क कायद्यात खासगी शाळेत २५ टक्के टक्के प्रवेशाच्या तरतुदीने सरकारी शाळांचे पट २५ टक्के कमी झाले. या तरतुदीत मराठी खासगी शाळेतच फक्त प्रवेश घेता येईल, अशी तरतूद केली तर सरकारी व खासगी, जी शाळा दर्जेदार असेल तिथेच २५ टक्के पालक मुलांचा प्रवेश घेतील. विरोध खासगी शाळांना नाहीच, पण त्या 'मराठी खासगी शाळा' असाव्यात इतकाच मुद्दा आहे.

धोरणात्मक चुकीच्या बाबींमुळेही पटसंख्या कमी होते. आदिवासी विभागाच्या शासकीय ४९७ व खासगी ५५६ आश्रमशाळा आहेत. त्यात ४ लाख ५२ हजार विद्यार्थी आहेत, तर सामाजिक न्याय विभागाच्या ९७७ आश्रमशाळा आहेत, त्यात एक लाख १७ हजार विद्यार्थी आहेत. आदिवासी भागात विरळ लोकसंख्या आणि आश्रमशाळा ही पहिलीपासून आणि जिल्हा परिषद शाळाही पहिलीपासून. त्यामुळे दोन्हींकडेही विद्यार्थी मिळत नाहीत. म्हणून धोरणात्मक निर्णय करून पहिली ते चौथीचे विद्यार्थी पालकांजवळ राहून गावाच्या जिल्हा परिषदेत शिकतील, अशी भूमिका असावी. त्याबदल्यात पालकांना विशिष्ट रक्कम देण्यात यावी. अनाथ विद्यार्थ्यांसाठी एखाद्या आश्रमशाळेत पहिलीपासून सुविधा असावी. यातून जिल्हा परिषद शाळांचा आदिवासी भागात पट वाढेल व सरकारला एकाच सुविधेवर दोन ठिकाणी खर्च करावा लागणार नाही. गावात माध्यमिक शाळा असताना पुन्हा आश्रमशाळेत शिक्षण देण्यापेक्षा आदिवासी विभागाने फक्त वसतिगृहे चालवावीत. गावातील माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थी शिकतील. त्यातून दोन्हीकडे खर्चही करावा लागणार नाही व मराठी शाळांचे पट वाढतील. महत्त्वाचे म्हणजे, आदिवासी व इतर जातींचे विद्यार्थी एकत्र शिकतील. जिल्हा परिषद शाळा सातवीपर्यंत व माध्यमिक शाळाही पाचवीपासून, अशा ठिकाणीही एकच शाळा गरजेची आहे.

एकीकडे जिल्हा परिषद शाळांकडून आपण गुणवत्तेची अपेक्षा करताना महाराष्ट्रात कोणत्याही जिल्ह्यात आज निम्म्यापेक्षा जास्त ठिकाणी गटशिक्षणाधिकारी नाहीत आणि केंद्रप्रमुख पदांची शिक्षकांतून बढती होत नसल्याने बहुसंख्य पदे रिक्त आहेत. बुलढाणा जिल्ह्यात १३ पैकी चार गटशिक्षणाधिकारी, ४५ पैकी २० विस्ताराधिकारी आणि १३० पैकी ४० केंद्रप्रमुख नेमलेले आहेत. न्यायालयीन तंटा असला तरी न्यायालयाला गांभीर्य पटवून वेगाने निकालात काढणे शक्य आहे. शिक्षकभरती नाही. वर्ग रिकामे पडतात. शिक्षकांचा कागदी आणि ऑनलाइन कामात जाणारा वेळ कमी होत नाही. शिक्षण विभागात भ्रष्टाचार वाढल्याने नैतिक धाक संपला आहे. अधिकाऱ्यांची शाळा भेटींची संख्या खूप कमी झाली आहे. त्यातून वाचन-लेखन न येणाऱ्यांची संख्या वाढली आहे. पर्यवेक्षण यंत्रणा प्रभावी काम करत नाही. त्यामुळे पूर्ण संख्येने अधिकारी नेमून प्रभावी शाळाभेटी झाल्या तरच पटसंख्या वाढेल. शिक्षकांना जबाबदार धरलं तरी, दुसरीकडे सरकार या गोष्टी करत नाही, याचे काय करायचे? सरकारवर काय कारवाई करायची?

यानिमित्ताने कमी पटाच्या शाळांबाबतही स्पष्टपणे निर्णय घेण्याची गरज आहे. सिंधुदुर्ग आणि इतर बहुतेक जिल्ह्यांत १० पेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या शेकडो शाळा आहेत. अशा शाळा एकत्र करून समूह निवासी शाळा करणे हाच मार्ग आहे. त्यामुळे नंदुरबार जिल्ह्यात जसा प्रयोग केला, तशाप्रकारे या छोट्या शाळा बंद करून या शाळेतील विद्यार्थी निवासी स्वरूपात एकत्र आणण्याची गरज आहे. तरच कमी पटाच्या शाळांचा प्रश्न सुटेल. त्याचबरोबर कमी अंतरात गरज नसताना ज्या शाळा सुरू केल्या गेल्या, त्या अंतर तपासून बंद केल्या तर पटसंख्या पुरेशी उपलब्ध होईल. सरकार उदासीन आहे. धोरणे चुकीची आहेत. याविरुद्ध संघर्ष करू या आणि ते करताना शिक्षक म्हणून दत्तात्रय वारे यांच्यासारखे शिक्षक अन्याय होऊनही तीन वर्षांत पटसंख्या तीनची जर १२० करत असतील तर तो आदर्श घेऊन पटसंख्या वाढवू या. उत्कृष्ट जिल्हा परिषद शाळांकडे मोठ्या संख्येने विद्यार्थी इंग्रजी शाळेकडून प्रवेश घेतात. त्यामुळे पटसंख्या वाढायला धोरणबदल आणि गुणवत्ता हेच उत्तर आहे.

## 'त्रिभाषा' नकोच





मराठी आणि इंग्लिश माध्यमांच्या शाळांत पहिलीपासून तिसरी भाषा (म्हणजेच हिंदी) शिकविण्याच्या धोरणाबाबत चर्चेअंती निर्णय घेण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका स्वागतार्ह म्हणता येईल. पहिलीपासून त्रिभाषा सूत्र राबविण्यामागून सरकार एक पाऊल मागे हटल्याचे यातून दिसते. मात्र, तसे ठोसपणे म्हणता येणार नाही; कारण गेल्या वर्षभरापासून धोरणात्मक स्तरावर असलेल्या या मुद्द्यावरून विरोधानंतरही सरकार पूर्णपणे मागे हटलेले नाही. पहिलीपासून हिंदी शिकविण्याच्या धोरणाला राज्यातून सर्व स्तरांतून कडाडून विरोध झाला. हा विरोध केवळ हिंदीच्या द्वेषातून किंवा मराठी भाषेची अस्मिता धारदार करण्यातून झाला नव्हता; तर शिक्षणशास्त्राच्या आणि बालमानसशास्त्राच्या दृष्टिकोनातूनही होता. लहान वयात मुले अनेक भाषा शिकतात हे खरे असले, तरी औपचारिक पद्धतीने त्यांच्यावर तीन भाषा शिकण्याचे ओझे लादणे शिक्षणशास्त्राला धरून नाही. मात्र, यानंतरही सरकार त्रिभाषा सूत्रावर ठाम राहिले. तिसरी भाषा म्हणून हिंदीच का, हा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर अन्य भाषांचा पर्याय देण्याचे आश्वासन खुद्द मुख्यमंत्र्यांनी दिले. त्याची अंमलबजावणी झाली; परंतु अन्य भाषा निवडण्यासाठी वीस विद्यार्थी एकत्र असण्याची अट घातली गेली. अनेक ठिकाणी हे शक्य नसल्याने एक प्रकारे हिंदीची सक्ती कायम ठेवली गेली. त्याला पुन्हा एकदा जोरदार विरोध होऊ लागल्यावर सुरुवातीला हिंदी लादली नसल्याचे स्पष्टीकरण दिले गेले. हा मुद्दा ताणला जात असल्याचा आरोपही केला गेला. मात्र, विरोधाला धार चढताना दिसल्यावर सोमवारी अखेर बैठक घेतली गेली आणि चर्चेअंती निर्णय घेण्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. अशा महत्त्वाच्या विषयावर चर्चा होणे केव्हाही स्वागतार्ह. मात्र, चर्चेसाठी सरकार कोणाला बोलावणार हा प्रश्न आहे. पहिलीपासून त्रिभाषा राबविण्याच्या धोरणाला अनुकूल असणाऱ्यांनाच चर्चेला बोलाविल्यास वेगळा निर्णय होण्याची शक्यता कमी होते. फार तर हिंदीला पर्यायी भाषेसाठी विद्यार्थ्यांच्या संख्येची अट शिथिल होऊ शकते. मात्र, यामुळे पहिलीपासून त्रिभाषा सूत्र कायम राहील. या धोरणाचा खऱ्या अर्थाने फेरविचार करायचा असेल, तर सर्व संबंधित घटकांच्या प्रतिनिधींशी म्हणजेच भाषाअभ्यासक, शिक्षणशास्त्राचे अभ्यासक, बालमानसशास्त्रज्ञ, पालकांचे प्रतिनिधी आदी सर्वांशी चर्चा व्हायला हवी. त्याचबरोबर पहिलीपासून तीन भाषा शिकविणे खरोखरीच गरजेचे आहे काय, यावरही विचार व्हायला हवा. राज्यात मराठी आणि इंग्लिश ही माध्यमे सोडून अन्य माध्यमांतील म्हणजे उर्दू, हिंदी, कन्नड, गुजराती आदी माध्यमांतील विद्यार्थ्यांना पहिलीपासून त्यांच्या माध्यमाची भाषा, इंग्लिश आणि मराठी या तीन भाषा शिकायला मिळतात हे खरे. मात्र, मराठी आणि इंग्लिश माध्यमांच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत या विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे. नव्वद टक्के विद्यार्थी या दोन माध्यमांमधील आहेत. त्यामुळे अन्य माध्यमांच्या विद्यार्थ्यांचे श्रेयांक (क्रेडिट पॉइंट्स) वाढतील आणि मराठी व इंग्लिश माध्यमांची मुले श्रेयांकाच्या बाबतीत मागे पडतील, या युक्तिवादाला फार अर्थ नाही. प्राथमिक स्तरावर अनौपचारिक शिक्षण महत्त्वपूर्ण ठरते. त्यामधील उपक्रमांचे श्रेयांकात रूपांतर करण्याची व्यवस्था करता येऊ शकते. नवीन शैक्षणिक धोरणात (एनईपी) त्रिभाषा सूत्राचा उल्लेख असला, तरी ते माध्यमिक स्तरापासून राबविण्याची शिफारस आहे; शिवाय त्यात हिंदीचा उल्लेखही नाही. 'एनईपी'ची राज्यात अंमलबजावणी करताना त्यात बदल अपेक्षित असले, तरी त्रिभाषा सूत्राच्या बाबतीत बदल न करणेच योग्य ठरेल. मराठी आणि इंग्लिश माध्यमांच्या शाळांत पहिली ते पाचवी या इयत्तांत फक्त मराठी आणि इंग्लिश याच दोन भाषा शिकवाव्यात. सहावीनंतर तिसरी भाषा कोणती घ्यायची याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना दिले जावे. हिंदीच्या सक्तीला राज्यात होत असलेला विरोध सत्ताधाऱ्यांनी समजून घ्यायला हवा. मराठीला अभिजात दर्जा वगैरे मिळाला असला, तरी केवळ मुंबईतच नव्हे, तर राज्यातील अन्य शहरांतही हिंदीचे वर्चस्व वाढले आहे. ती सार्वजनिक ठिकाणी संभाषणाची अनौपचारिक भाषा बनली आहे. हिंदी चित्रपटांपासून क्रिकेटच्या समालोचनांपर्यंत विविध माध्यमांतून हिंदी सर्वसामान्यांच्या कानावर आदळत असतेच. त्या तुलनेत मराठीचा प्रसार नाही. मराठी अद्याप पूर्णपणे ज्ञानभाषा बनलेली नाही; आणि बाजारपेठेची भाषाही नाही. या पार्श्वभूमीवर हिंदीचा वाढता प्रचार मराठी भाषकांसाठी चिंताजनक ठरू शकतो. हिंदीला महाराष्ट्राने कधीच विरोध केलेला नाही. मात्र, तिच्यासाठीच्या पायघड्या मराठीच्या मुळावर येण्याची भीती आहे. पहिलीपासून हिंदीचे धोरण म्हणजे पायघड्या रुंद करण्याचा प्रकार. हिंदीबाबत भारतीय जनता पक्षाचे धोरण काहीही असले, तरी महाराष्ट्रात ती मराठीला डोईजड होणार नाही, हे पाहावे लागेल. पहिलीपासून असलेले त्रिभाषा सूत्र रद्द करणे ही त्याची सुरुवात असेल.

# चटकदार रीव्हर्स वडापाव

**साहित्य :** ४ व्हाइट ब्रेड स्लाइस, बेसन, हिरवी चटणी, लाल सुकी चटणी, ६ पाकळ्या बारीक चिरलेला लसूण, आल्याचा तुकडा ठेचलेला, कढीपत्ता, १ कांदा बारीक चिरलेला, बेकिंग सोडा, हिंग, जिरे, मोहरी, हिरवी मिरची बारीक चिरलेली, मीठ, ४ उकडून कुस्करलेले बटाटे, कोथिंबीर बारीक चिरलेली, तेल.

**भाजीची कृती :** प्रथम पॅनमध्ये १ टेबलस्पून तेल गरम करायला ठेवा. तेल तापले की, त्यात जिरे, मोहरी, कढीपत्ता, हिंग, लसूण, आले, हिरवी मिरची, कांदा व हळद घालून नीट ढवळून एक करा. कांदा लालसर झाला की त्यात कुस्करलेला बटाटा घाला व मिश्रण नीट परतवत राहा. नंतर आवश्यक तेवढे मीठ घाला आणि झाकण ठेवून एक वाफ काढा. मग कोथिंबीर घाला व गॅस बंद करा.

**बेसनाचा घोळ :** एका बाऊलमध्ये बेसन घ्या. त्यात १/२ टीस्पून प्रत्येकी बेकिंग सोडा, हळद व मीठ घाला. आवश्यकतेनुसार पाणी घालून बेसनाचा घोळ तयार ठेवा.

**सँडविच कृती :** ब्रेड स्लाइसच्या कडा कापून घ्या व चार चौकोनी तुकडे करा. एका तुकड्यावर हिरवी चटणी लावा व त्यावर लाल चटणी टाका. दुसरा ब्रेडचा तुकडा त्यावर



ठेवा. अशाप्रकारे सर्व सँडविच करून घ्या. आता पॅन गॅसवर गरम करायला ठेवा व त्यात थोडे तेल घालून पसरवा. तेल तापल्यावर तयार छोटे सँडविच दोन्ही बाजूनी भाजून घ्या.

**कृती :** वरील तयार भाजीचे गोळे करून तयार ठेवा. एक गोळा घेऊन हातावर त्याची पाती करा व पातीवर वरील सँडविच ठेवा. वरून दुसरी पाती ठेवा व सँडविच बटाट्यानी नीट बंद करून हलक्या हाताने दाबा. अशाप्रकारे सर्व सँडविचचे वडे तयार करून घ्या. कढईत तळण्यासाठी मध्यम आचेवर तेल तापायला ठेवा. आता प्रत्येक वडा बेसनाच्या घोळात बुडवून तेलात तळून घ्या व मधून कापून चटणी किंवा सॉसबरोबर गरम गरम सर्व्ह करा.

# केसांना तेल लावताना घ्या 'ही' काळजी

**केसांचं आरोग्य जर निरोगी राखायचं असेल तर त्यांची नीट काळजी घेणं गरजेचं आहे. लांबसडक, काळेभोर केस असावेत अशी प्रत्येक तरुणीची इच्छा असते. मात्र असे केस मिळवण्यासाठी केसांना दररोज तेल लावणं गरजेचं आहे. केसांना दररोज तेल लावल्यामुळे केसांची मुळं मजबूत होतात. त्यासोबतच डोक्यावरील त्वचेसाठीही तेल तितकंच गरजेचं असतं. तेलामुळे डोक्यावरील त्वचेला पोषण मिळतं. तसंच रक्तपुरवठाही सुरळीत होतो.**

केसांसाठी नारळाचं तेल, बदामाचं तेल किंवा मोहरीचं तेल विशेष गुणकारी असतं. या तेलाचा वापर केल्यामुळे केस काळेभोर आणि घनदाट होण्यास मदत होते. मात्र तेलाचा वापर करताना काही गोष्टींकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. चला तर मग जाणून घेऊयात तेल लावताना कोणत्या गोष्टी कराव्यात आणि कोणत्या गोष्टी टाळाव्यात याविषयी -





**डोक्यावरील त्वचेकडे लक्ष देणे**

तेल लावताना डोक्यावरील त्वचेकडे लक्ष देणे विशेष गरजेचं आहे. त्यासोबतच केसांच्या मुळाकडेही तितकंच लक्ष द्यावं लागतं. केसांची मूळ मजबूत असतील तर केसांची वाढ लवकर होते. त्यासोबतच केसांची गळतीदेखील होत नाही. डोक्यावर नारळाच्या तेलाने मसाज केल्यास याचा परिणाम लवकर दिसून येतो.

**रोज केसांना मसाज करावा**

केसांच्या आरोग्यासाठी केसांना केवळ तेल लावणं हा उपाय नाही तर तेल लावण्यासोबतच केसांच्या मुळांना मसाज करणेदेखील गरजेचं आहे. मसाज करण्यासाठी शक्यतो कोमट तेलाचा वापर करावा. कोमट तेलाने मसाज केल्यामुळे केसांची मुळं बळकट होतात.

**तेल लावणं कधीही विसरू नका**

केसांना तेल लावल्यामुळे अनेक वेळा केसांमध्ये चिकटपणा निर्माण होतो, अशी तक्रार महिला वर्गातून येत असते. त्यामुळे अनेक वेळा तरुणी केसांना तेल लावण्याचं टाळतात. मात्र केसांना तेल न लावण्याची चूक कधीही करू नका. केसांच्या वाढीसाठी तेल लावणं महत्त्वाचं आहे. घराच्या बाहेर पडल्यानंतर केसांना धूळ, माती, प्रदूषण या साऱ्या घटकांचा सामना करावा लागतो. त्यामुळे केस कोरडे होतात. परिणामी केसांचं गळण्याचं आणि केस तुटण्याचं प्रमाण वाढतं. या साऱ्या समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी केसांना तेल लावणं गरजेचं आहे.

**तेल किंवा शाम्पूचा अतिरेकही करू नये**

कोणतीही गोष्ट प्रमाणापेक्षा जास्त झाली तर त्याचे दुष्परिणामही सहन करावे लागतात. त्यामुळे तेल असो किंवा शाम्पू दोघांचाही वापर प्रमाणात असावा. जर डोक्यावर तेलाचा जास्त मारा झाला तर डोक्यावरील भार वाढतो आणि केसदेखील तेलकट दिसून लागतात.

# फूड पॉइजनिंगपासून बचावासाठी ४ प्रभावी उपाय

**बाहेरचा आहार घेणे अनेकदा त्रासदायक ठरतं. खाद्यपदार्थ लवकर खराब होतात आणि यामुळेच फूड पॉइजनिंगचा त्रास उद्‌भवतो. अशाच काही टिप्स लक्षात ठेवल्या तर यापासून वाचता येऊ शकतं.**

- **लिंबाचे सेवन**

लिंबात अँटी-इंफ्लेमेटरी, अँटीबेक्टेरियल आणि अँटीव्हायरल गुण आढळतात. म्हणून लिंबू पाणी पिण्याने बॅक्टेरिया मरतात. आपण रिकाम्यापोटी लिंबू पाणी पिऊ शकता. शक्य असल्यास गरम पाण्यात लिंबू पिळून पिऊ शकतात. परंतु पाणी स्वच्छ असावे याची काळजी घेणे अती आवश्यक आहे.

- **तुळशीचे सेवन**

तुळशीत आढळणारे अँटीमिकोबियल गुणधर्म सूक्ष्मजीवांच्या सामोरे जातात. तुळस अनेक प्रकारे आहारात सामील करता येईल. दह्यात तुळशीचे पान, काळीमिरी आणि मीठ घालून सेवन करू शकता किंवा चहात तुळशीचे पान टाकून सेवन करू शकता.

- **दह्याचे सेवन**

दही एका प्रकारे अँटीबायोटिक आहे आणि यात जरा काळं मीठ घालून खाल्ल्याने आराम मिळेल.

- **लसणाचे सेवन**

लसणात अँटी फंगल गुण असल्यामुळे सकाळी रिकाम्या पोटी लसणाच्या १-२ पाकळ्या पाण्यासह घेतल्याने आराम मिळेल.



# धकाधकीच्या जीवनात ग्रीन टीचे फायदे

**आजचे** धकाधकीचे जीवन, बदलती जीवनशैली, बदलते आहार यांमुळे अनेक आजार डोकं वर काढत आहेत. एवढंच नाही तर वाढत्या कामाच्या तणावामुळे गेल्या काही वर्षांपासून ग्रीन टी नियमित पिणाऱ्यांच्या संख्येतसुद्धा वाढ होताना दिसत आहे. योग्य आणि नियमित प्रमाणात ग्रीन टीचे सेवन शरीरास हितकारक ठरू शकते.



परंतु ग्रीन टीचे प्रमाणाबाहेर सेवन केल्यास ते आरोग्यास घातकदेखील ठरू शकते. ग्रीन टीमध्ये थेनाईन तत्त्व जास्त प्रमाणात असतात, त्यामुळे अमिनो ॲसिड बनते. अमिनो ॲसिड शरीरात ताजेपणा कायम ठेवण्यास मदत करते. तसेच तुम्हाला थकवा जाणवत नाही. सध्या तरुणांमध्ये आणि वृद्धांमध्ये कॅव्हिटीच्या समस्या वेगाने वाढत आहेत. ग्रीन टीमध्ये कॅफीन असते जे दातांवरील किटाणू मारण्यास सक्षम असते. बॅक्टेरिया कमी झाल्याने अधिक काळापर्यंत तुमचे दात चांगले राहतात. सतत वाढत्या कामामुळे, दररोजच्या व्यस्त वेळापत्रकामुळे रक्तदाबाच्या समस्यांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. रक्तदाबाचा त्रास असल्यास त्यावर ग्रीन टी फायदेशीर आहे. त्याचप्रमाणे हृदयरोग असणाऱ्यांसाठी ग्रीन टीचे सेवन फायदेशीर ठरते. वजन कमी करण्यासाठी ग्रीन टी उपयोगी ठरते. ग्रीन टी प्यायल्याने शरीरातील मेटाबॉलिज्म रेट वाढतो ज्यामुळे पाचनक्रिया सुरळीत होते.



# पिअर्सिंग करताना द्या 'या' गोष्टींकडे लक्ष

बाजारामध्ये सध्या नवनवीन फॅशनचा ट्रेण्ड येत आहे. प्रत्येक ऋतूप्रमाणे हा ट्रेण्ड बदलत जातो. विशेष म्हणजे आजची तरुणाईदेखील हा फॅशन ट्रेण्ड उत्तमरित्या कॅरी करताना दिसत आहे. त्यातच मग पाहायला गेलं तर आज प्रत्येक तरुणाईच्या अंगावर टॅटू किंवा पिअर्सिंग दिसून येतात. अनेक जण आवड म्हणून तर काही जण केवळ फॅशन म्हणून या गोष्टी करतात. सध्या तरुणाईमध्ये पिअर्सिंगची मोठ्या प्रमाणावर क्रेझ दिसून येत आहे. मात्र, पिअर्सिंग करताना काही गोष्टींची विशेष काळजी घेतली पाहिजे. पिअर्सिंग म्हणजे शरीरावरील काही भागांवर रिंग किंवा अन्य एखादा दागिना टोचून घेणे. यामध्ये अनेक जण कान, नाक, भुवयी किंवा ओठांवर टोचून घेतात. मात्र, अनेक वेळा शरीरावर टोचून घेतल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष केल्यास अनेक समस्या निर्माण होऊ शकतात.




- **संसर्ग होणे –**

पिअर्सिंग करताना विशेष काळजी घेतली पाहिजे. त्यासोबतच एखाद्या एक्सपर्ट व्यक्तीकडून हे करून घ्यावं. कारण अनेक वेळा हलगर्जीपणामुळे पिअर्सिंग करताना रक्तात संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे जर संसर्ग झाल्याची शक्यता निर्माण झाल्यास त्वरित डॉक्टरांकडे जावे.

- **ॲलर्जी होणे–**

विशिष्ट धातूंचा वापर करून शरीरावर बॉडी पिअर्सिंग करण्यात येतं. काही जणांची त्वचा सेन्सेटिव्ह असते. त्यामुळे अशा व्यक्तींना या धातूपासून ॲलर्जी होण्याची शक्यता असते. त्यामुळे अनेक वेळा बॉडी पिअर्सिंग केल्यानंतर सूज येणे, रॅशेस येणे यासारख्या समस्या निर्माण होतात.



- **अतिरिक्त रक्तस्त्राव–**

बॉडी पिअर्सिंग करतान कधी कधी सुई चुकीच्या ठिकाणी टोचली जाते. परिणामी, अशा ठिकाणाहून रक्तस्त्राव होण्यास सुरुवात होते. त्यामुळे पिअर्सिंग करताना विशेष काळजी घेण्याची गरज असते.

- **तज्ज्ञ व्यक्तीकडून पिअर्सिंग करावे –**

पिअर्सिंग कधीही या क्षेत्रातील तज्ज्ञ किंवा योग्य प्रशिक्षित व्यक्तीकडून करून घ्यावं. कमी अनुभवी व्य तकडून पिअर्सिंग करून घेतलं. तर त्याचा थेट परिणाम तुमच्या शरीरावर होऊ शकतो. चुकीच्या ठिकाणी पिअर्सिंग करून घेतल्या तर या ठिकाणचा भाग मृत होण्याची शक्यता असते.

# काळे, दाट, सुंदर केसांसाठी ऑलिव्ह ऑइलचा वापर

**जास्त उन्हात केसांच्या अनेक समस्या निर्माण होतात. शरीराची विशेष काळजी घेणं या वेळी गरजेचं असतं. गर्मीमुळे घाम, ओलसरपणामुळे केस अधिकच खराब व्हायला लागतात. त्यात बदललेल्या जीवनशैलीचा आणि खाण्या-पिण्याचा परिणाम… अशात केसांची योग्य ती काळजी घेणं गरजेचं असतं… त्यासाठी ऑलिव्ह ऑईल उपयुक्त आहे.**

- ऑलिव्ह ऑइलनं केसांची मसाज करा, हे एक उत्तम कंडिशनर आहे.
- ऑलिव्ह ऑइल एक अँटी ऑक्सिडेंटचं काम करतं. त्यामुळं डँड्रफ आणि केस पांढरे होण्यापासून वाचतात.
- जर आपण केसांसाठी होममेड ट्रिटमेंट घेऊ इच्छिता तर ऑलिव्ह ऑइल बेस्ट आहे. ते आपले केस हेल्दी करतात.
- ऑलिव्ह ऑइलमध्ये मोनो सॅच्युरेटेड फॅटी ॲसिड असतं. जे केसांना नैसर्गिक ओलावा देतं.
- ऑलिव्ह ऑइल त्वचेसाठीही फायद्याचे आहे. यानं मालिश केल्यास त्वचेतील ओलावा टिकून राहतो.





# डायबेटिसपासून स्वताचे रक्षण करण्यासाठी हे टाळा

**सध्या जगातील सर्वात जास्त भेडसावणारी समस्या म्हणजे डायबेटिस… जगात भारत हा डायबेटिसचा मोठा बळी आहे. भारतात डायबेटिसग्रस्त लोकांची संख्या नवनवे आकडे पार करतेय. डायबेटिस पूर्णपणे बरा करता येत नसला तरी काही प्रमाणात रोखला जाऊ शकतो. त्यापासून स्वतःचे रक्षण करता येते. त्यामुळे तुम्ही या विकाराचे बळी होऊ नये म्हणून काही काळजी घेणे आवश्यक आहे.**



- **वजन घटवा**

तुम्ही जर स्थूल असाल तर तुमचे वजन कमी करण्याचा प्रयत्न करा. जास्त वजन हे डायबेटिस होण्यासाठी पूरक असते. वजन घटवल्याने शरीरात तयार होणाऱ्या इन्शुलिनमध्ये वाढ होते आणि त्यामुळे मधुमेहाचा धोका कमी होण्यास मदत होते.

- **नाश्ता करा**

सकाळी उठल्यानंतर दोन ते तीन तासांत नाश्ता करण्याची सवय स्वतःला लावून घ्या. यामुळे डायबेटिसचा धोका कमी होण्यास मदत होते. नाश्ता करणे अजिबात टाळू नका.

- **तंतूमय (फायबर) पदार्थांचे सेवन करा**

आहारात फळे, भाज्या, डाळी आणि टणक कवचाच्या फळांचा समावेश करा. तंतूमय पदार्थांचा आहारात समावेश असणे फार गरजेचे आहे. आहारातून शरीरात येणाऱ्या शर्करेचे प्रमाण कमी करण्यास हे पदार्थ मदत करतात.

- **शारीरिक व्यायाम**

नियमित व्यायाम करणे तुमच्या आरोग्यासाठी गरजेचे आहे. व्यायामामुळे केवळ वजन कमी होते असे नाही, तर शरीरात उत्पन्न होणारे इन्शुलिन योग्य पद्धतीने वापरले जाते. त्यामुळे डायबेटिसचा धोका कमी होतो.

- **धूम्रपान टाळा**

तुम्ही जर धूम्रपान करत असाल तर ते आताच बंद करा. टाईप २ चा डायबेटिस धूम्रपानामुळे होण्याची मोठ्या प्रमाणात शक्यता असते. त्यामुळे या कारणाला बगल देणे गरजेचे आहे.



# हँड ड्रायरखाली हात सुकवणं धोकादायक, जाणून घ्या याचे कारण



**हॉटेल, थिएटरमध्ये, 'हँड ड्रायर'खाली हात सुकवणं सर्वाधिक धोकादायक असल्याचं एका संशोधनातून समोर आलंय. टॉयलेटमध्ये हँड ड्रायरमुळे हात आणि शरीरावर बॅक्टेरिया चिकटण्याची शक्यता जास्त असून तज्ज्ञ डॉक्टरांनी याला दुजोरा दिला आहे.**

**विमानतळ,** रेस्टॉरंट, कॉर्पोरेट ऑफिस किंवा शहरातील काही टॉयलेटमध्ये हात सुकवण्यासाठी हँड ड्रायरचा वापर केला जातो. ओले हात सुकवण्यासाठी हँड ड्रायरखाली काही सेकंद हात धरले जातात. त्यामुळे हात कोरडे होतात. पण अशा पद्धतीने हात सुकवणं आरोग्यासाठी घातक आहे. ॲप्लाईड आणि इन्वॉयर्नमेंटल मायक्रोबायोलॉगी जर्नलमध्ये छापण्यात आलेल्या एका संशोधनानुसार, हँड ड्रायरखाली हात सुकवल्याने आपल्या स्वच्छ हातावर पुन्हा जंतू किंवा बॅक्टेरिया बसण्याची शक्यता असते. ड्रायरच्या वापरामुळे हवेतील 'बॅक्टेरियल पॉथजीन्स स्पोअर्स' धारांमध्ये शिरू शकतात. ज्यामुळे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. हँड ड्रायरच्या वापराने हातावर अधिक बॅक्टेरिया येण्याची शक्यता असते.

टॉयलेटमध्ये असणाऱ्या हवेत फ्लोटिंग बॅक्टेरिया असतात. त्यापैकी आपण हँड ड्रायरचा वापर करतो, त्या वेळी ते बॅक्टेरिया हातावर चिकटण्याची शक्यता असते. या बॅक्टेरियामुळे अनेक आजारही होऊ शकतात, असं सेंट जॉर्ज रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मधुकर गायकवाड यांनी सांगितलं.

सशोधकांनी एक प्लेट ३० सेकंद हँड ड्रायरखाली धरली. या प्लेटवर १८ ते ६० विविध बॅक्टेरिया जमा झालेले दिसले. पण हँड ड्रायरच्या आतील बाजूस मात्र कमी प्रमाणात बॅक्टेरिया होते. हँड ड्रायर बंद करूनही प्लेट दोन मिनिटे धरली. त्या प्लेटवर कमी प्रमाणात बॅक्टेरिया आढळून आले. ही प्लेट पुन्हा टॉयलेटमध्ये फॅन सुरू ठेवून २० मिनिटे धरण्यात आली. या प्लेटवर १५ बॅक्टेरिया सापडले. मात्र, या मशीनशिवाय आपण टॉवेल किंवा टिशू वापरु शकतो आणि या मशीनचा वापर टाळू शकतो, असा सल्ला तज्ज्ञांनी दिलाय.

# बहुगुणकारी ताडगोळे

**ताडगोळे हे फळ वर्षामध्ये ठरावीक ऋतूमध्ये, म्हणजे उन्हाळ्यामध्ये उपलब्ध असणारे फळ आहे. याची चव काहीशी शहाळ्यातील मलई प्रमाणे लागत असून, चवीला हे फळ मधुर असते. इंग्रजी भाषेमध्ये 'आईस ॲपल' या नावाने ओळखले जाणारे हे फळ आरोग्याच्या दृष्टीने देखील अतिशय गुणकारी असल्याचे म्हटले जाते. या फळाला मुंजाल या नावानेही काही प्रांतांमध्ये ओळखले जाते. या फळाचे आरोग्यासाठी असणारे फायदे जाणून घेऊ या…**



**ज्यांना** वजन घटवायचे असेल, त्यांच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळाच्या गरामुळे आणि यामध्ये असलेल्या रसामुळे भूक शमण्यास मदत होते. त्यामुळे वारंवार काही ना काही खाण्याची इच्छा होत नाही. ज्यांना लिव्हरशी निगडित काही समस्या असतील त्यांच्यासाठी देखील या फळाचे सेवन उपयुक्त आहे. या फळामध्ये पोटॅशियम मुबलक मात्रेमध्ये असून त्यामुळे लिव्हरमध्ये साठलेले घातक, विषारी पदार्थ बाहेर पडण्यास मदत होते. या फळाच्या सेवनामुळे शरीराला श्रम करण्यासाठी आवश्यक ताकद आणि ऊर्जा मिळत असते. या फळाच्या सेवनामुळे शरीरातील ग्लुकोजची पातळी वाढत असल्यामुळे दिवसभराच्या कामासाठी लागणारी ताकद या फळाच्या सेवनाने मिळत असते.

या फळाच्या सेवनाने शरीराला आवश्यक असलेले क्षार आणि इतर पोषक तत्त्वे संतुलित मात्रेमध्ये मिळत असतात. ज्यांना त्वचेवर उन्हाळ्यामुळे सतत पुरळ येत असेल किंवा ज्यांना या दिवसांमध्ये चेहऱ्यावर सतत मुरुमे येत असतील त्यांच्यासाठी देखील या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळामध्ये कर्करोगप्रतिरोधी तत्त्वे असून, विशेषतः महिलांमध्ये आढळणाऱ्या स्तनाचा कर्करोग टाळण्यासाठी या फळाचे सेवन उत्तम मानले गेले आहे. या फळामध्ये अँथोसायनिन नामक फायटोकेमिकल स्तनाच्या कर्करोगापासून बचाव करणारे आहे. आरोग्यासाठी या फळाचे फायदे पुरेपूर मिळवण्यासाठी उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये या फळाचे भरपूर सेवन करावे.

# कोणतेही ॲप डाऊनलोड करताना राहा सावध!

## 'या' ४ गोष्टींकडे द्या विशेष लक्ष, नुकसान होणार नाही

**युजर्स** गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करतात. पण तुम्हाला माहिती आहे का? गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे कधी-कधी धोकादायक ठरू शकते. कसे ते जाणून घ्या. आजकाल प्रत्येकाकडे स्मार्टफोन असतो आणि त्यामध्ये अनेक ॲप्स असतात. या ॲप्समुळे रोजची अनेक महत्त्वाची कामे कुठल्याही अडचणींशिवाय पार पडतात. अनेक जण गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करतात. पण तुम्हाला माहीत आहे का की, काही वेळा गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे धोकादायक ठरू शकते. तुम्ही अँड्रॉइड युजर असाल तर ही विशेष माहिती नक्कीच तुमच्या कामी येईल. पाहा डिटेल्स.



**हे असू शकते धोकादायक**

काही वेळा गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे धोकादायक ठरू शकते. कारण, गुगल प्ले स्टोअर मालवेअर आणि हॅकर्ससाठी ॲप्स फारसे स्कॅन करत नाही. अशा परिस्थितीत गुगलच्या स्टोअरवर मालवेअर प्रभावित ॲप्स असण्याची शक्यता आहे. तुम्ही हे ॲप डाऊनलोड केल्यास ते तुमचा वैयक्तिक डेटा चोरू शकतात. हे तुमची आर्थिक ओळखपत्रे देखील चोरू शकतात.

**असे सुरक्षित रहा**

तुम्ही डाऊनलोड करत असलेले ॲप तुम्हाला कोणत्या पर्मिशन्स विचारतात याकडे नेहमी लक्ष दिले पाहिजे. उदाहरणार्थ- तुम्ही एडिटिंग ॲप डाऊनलोड केल्यास ते ॲप तुम्हाला स्टोरेज, कॅमेरा, मायक्रोफोन आणि फोटो गॅलरी यासाठी परवानगी मागते. पण त्या ॲपला कोणत्या परवानग्या हव्यात याकडे तुम्हाला लक्ष द्यावे लागेल. जेव्हाही आपण एखादे ॲप डाऊनलोड करतो तेव्हा त्याचे रिव्ह्यू नक्की वाचा. हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण, लोक त्यांच्या ॲपच्या अनुभवावर आधारित रिव्ह्यू देतात. तुम्हाला ॲपचे वाईट रिव्ह्यू आढळल्यास ॲप डाऊनलोड करू नका.

जेव्हा तुम्ही एखादे ॲप डाऊनलोड करता, त्याआधी ते ॲप किती वेळा डाऊनलोड केले आहे ते पहा. ही तपासणी करणेदेखील महत्त्वाची आहे. कारण, जितक्या जास्त लोकांनी ॲप डाऊनलोड केले आहे तितकाच ॲपवर अधिक विश्वास निर्माण होतो.

गुगल प्ले स्टोअरवर प्रत्येक ॲप निर्माता त्यांच्या ॲपबद्दल तपशील देतो. त्याचा स्त्रोत काय आहे हेदेखील सांगतो. जर तुम्हाला स्त्रोत योग्य वाटत असेल किंवा तपशील बरोबर असतील तरच ॲप डाऊनलोड करा.

# विक्रोळी उड्डाणपुलावर दुभाजक

## जीपीएस यंत्रणेचा अभाव... प्रवाशांमध्ये अपघाताची भीती

**■मुंबई(बातमी/लेख प्रीती दीपक नाईक) :** विक्रोळी येथील लालबहादूर शास्त्री मार्गापासून पूर्व द्रुतगती मार्गाला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा ६१५ मीटरचा पूल मुंबई महानगरपालिकेने पाच वर्षांचा कालावधी घेऊन पूर्ण केला. यासाठी पालिकेने तब्बल १०४ कोटी रुपये खर्च करून १४ जून रोजी हा पूल वाहतुकीसाठी खुला केला. परंतु, उभारलेल्या या पुलावर दुभाजक बांधणे, जीपीएस यंत्रणा बसवणे तसेच हा पूल एक मार्गी आहे की दोन मार्गी याची माहिती पालिकेने स्पष्ट न दिल्याने प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. तसेच, कन्नमवारनगरहून टागोरनगरकडे जाताना वाहनचालक पुलावरूनच 'यू टर्न' घेऊन शॉर्टकटचा मार्ग अवलंबत असल्याने या ठिकाणी अपघाताचा धोका वाढला आहे.



दरम्यान, पावसाळ्याच्या कालावधीमध्ये लालबहादूर शास्त्री मार्गावर बऱ्याच वेळा वाहतूककोंडी होते. नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागतो. ही बाब विचारात घेता कोणत्याही अधिकृत समारंभाची वाट न पाहता हा पूल नागरिकांसाठी खुला करण्याचा निर्णय राज्य सरकारच्या वतीने जाहीर करण्यात आला. त्यानुसार पालिकेने १४ जूनपासून हा पूल वाहतुकीसाठी खुला केला. परंतु, वाहतूक यंत्रणेत महत्त्वाचे असलेले दुभाजक, जीपीएस यंत्रणा बसवण्यास पालिकेला विसर पडला आहे. तसेच दिशादर्शक फलकावर हा रस्ता एकमार्गी की दोनमार्गी आहे हा संभ्रम प्रवाशांमध्ये निर्माण झाला आहे.


विक्रोळी रेल्वे स्थानकाजवळ फाटक असल्याने ते ओलांडून अनेक जण पूर्व-पश्चिम असा प्रवास करत होते. वाहनचालकही याच मार्गाला पसंती देत होते. फाटक ओलांडताना पादचारी, वाहनचालकांचे अनेक अपघात झाल्याने उड्डाणपूल उभारण्याची मागणी स्थानिकांमधून होऊ लागली. त्यानुसार एप्रिल २०१८ मध्ये मुंबई महापालिकेने या कामाचे कार्यादेश काढले. त्यानुसार मे २०१८ मध्ये पुलाच्या कामाला सुरुवात झाली. मात्र, जलद बांधकामासाठी पुलाच्या आराखड्यात अनेक बदल करण्यात आले. आयएस मानांकनाच्या नवीन प्रणालीमुळे आराखड्यात बदल करतानाच त्याच्या मंजुरी प्रक्रियेसही विलंब झाला आणि पुलाची रखडपट्टी सुरू झाली. साधारण २०२० च्या सुरुवातीला पुन्हा महत्त्वाच्या कामांना सुरुवात झाली. दरम्यान, कोरोना काळात कामाची गती मंदावली. मात्र गेल्या वर्ष-दीड वर्षाच्या कालावधीत पालिकेने कामांना वेग देत ही कामे विहित वेळेत पूर्ण केली. पूल बांधण्यासाठी एकूण १०४. ७७ कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे.

# सीबीएसई शाळा प्रवेशासंदर्भात भेटू नका

## शिक्षण उपायुक्तांच्या फलकामुळे पालक संभ्रमात

**■नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने सुरू केलेल्या सीबीएसई शाळांतील प्रवेश प्रक्रियेवरून पालकांमध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटत आहे. पात्र असूनही आपल्या पाल्यांना प्रवेश न मिळाल्याच्या शेकडो तक्रारी पालकांनी केल्या आहेत. या तक्रारींचे निवारण किंवा समाधान शिक्षण उपायुक्त करू शकतात, मात्र या त्यांच्याच दलालांवर सीबीएसई शाळा प्रवेश संदर्भात भेटू नये, अशी सूचना लावल्याने पालकांमध्ये संभ्रम पसरला असून आता दाद कोणाकडे मागावी? असा प्रश्न देखील पालकांनी उपस्थित केला आहे.

विशेष म्हणजे, या तक्रारींचे निवारण किंवा मार्गदर्शन करण्यासाठी पालकांनी शिक्षण उपायुक्तांना भेटण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्या दालनाबाहेर शाळा क्रमांक ९३ सीबीएसई, ९४ सीबीएसई आणि ९८ सीबीएसई या शाळांच्या प्रवेश संदर्भात भेटू नये,असा फलक लावण्यात आला आहे. या फलकामुळे पालक संभ्रमात असून आता आपली दाद नेमकी कुणाकडे मागायची असा प्रश्न उपस्थित झाला आहे.




"पात्र असूनही जर प्रवेश नाकारला जात असेल आणि आलेल्या अडचणी कुठेच सोडवल्या जात नसतील, तर पालकांनी उपायुक्तांकडेच दाद मागणे स्वाभाविक आहे. मात्र सध्या शिक्षणाधिकारी पद रिक्त आहे आणि उपायुक्तांनी भेटू नये असा फलक लावल्याने पालकांची अडचण अधिकच वाढली आहे. हा फलक अत्यंत गैर आणि जबाबदारीपासून दूर जाण्याचा प्रकार आहे."

**- समीर बागवान, उपशहर प्रमुख शिवसेना**

"सीबीएसई प्रवेश प्रक्रिया पूर्ण आणि पारदर्शक झाली आहे. ज्यांच्या पाल्यांचा नंबर लागलेला नाही ते पालक अनेकदा भेटीसाठी येतात. त्यांचे प्रश्न अनेकदा क्षुल्लक असतात आणि ते खालील पातळीवरच सोडवता येतात. त्यामुळे इतर महत्वाच्या प्रकल्पांमधील वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी हा फलक लावण्यात आला आहे."

**- संघरत्ना खिलारे, उपायुक्त शिक्षण विभाग**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांची पटसंख्या दरवर्षी वाढत असून, त्या इतर महापालिकांच्या तुलनेत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. त्यामुळे मनपाने सुरू केलेल्या सीबीएसई शाळा नागरिकांसाठी आकर्षण ठरत आहेत. मात्र या शाळा खासगी संस्थांकडे दिल्यानंतर प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव जाणवू लागला आहे.

प्रवेश प्रक्रियेच्या संदर्भात सर्वात मोठी अडचण म्हणजे शाळेच्या १ किलोमीटर परिघातील विद्यार्थ्यांनाही प्रवेश नाकारण्यात येत असल्याच्या तक्रारी. याबाबत माजी नगरसेवकांनी लेखी तक्रार करून, परिघातील विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्यास तुकड्यांमध्ये वाढ करण्यात यावी अशी मागणी केली आहे. कोपरखैरणेतील शाळा क्रमांक ९४ ही अत्यंत सुसज्ज असून, ती खासगी शाळांनाही लाजवेल अशी आहे. मात्र अशा शाळेत अनेक पात्र विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहत असतील तर इमारतीच्या सुसज्जतेचा काय उपयोग, असा सवाल माजी नगरसेवक रवींद्र म्हात्रे यांनी उपस्थित केला आहे.

एकूणच, सीबीएसई प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाच्या मुद्यावर सध्या वादंग उठला असून, पालक, माजी नगरसेवक आणि स्थानिक कार्यकर्ते या सर्वांमध्ये यावर ठोस उत्तर मिळावे अशी अपेक्षा आहे. शिक्षण हा मूलभूत हक्क असून, त्या हक्कापासून वंचित ठरणाऱ्यांसाठी प्रशासनाने अधिक खुली व संवादात्मक भूमिका घ्यावी, अशी जोरदार मागणी आता होत आहे.

# 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर थॉट्स' पदविका अभ्यासक्रमाचा समावेश

## नवी मुंबई महापालिका आणि मुंबई विद्यापीठामध्ये सामंजस्य करार

**■नवी मुंबई :** सामाजिक न्याय दिनाच्या पूर्वसंध्येला नवी मुंबई महानगरपालिका आणि मुंबई विद्यापीठ यांच्यात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर थॉट्स' या विषयावर पदव्युत्तर पदवीनंतरचा एक वर्ष कालावधीचा पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक हे तेथे सातत्याने होणाऱ्या विविध उपक्रमांमुळे 'ज्ञानस्मारक' म्हणून नावाजले जात आहे. या स्मारकातून बाबासाहेबांच्या ग्रंथवाचनाप्रमाणेच युवा अभ्यासकही तयार व्हावेत, या भूमिकेतून नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या संकल्पनेतून 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर थॉट्स' या विषयावर पदव्युत्तर पदवी नंतरचा एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम सुरू करण्याबाबतचा सामंजस्य करार न्याय दिनाच्या पूर्वसंध्येला मुंबई विद्यापीठाच्या सभागृहात करण्यात आला. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ. कैलास शिंदे तसेच मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.



### स्मारकाच्या नावलौकिकात अधिकच भर

विद्यापीठाचे निबंधक डॉ. प्रकाश कारंडे यांनी नवी मुंबई महानगरपालिकेसोबत झालेला हा सामंजस्य करार विद्यापीठाच्या कामकाजातील सर्वात कमी वेळेत झालेला करार असल्याचे आवर्जून सांगितले. मुंबई विद्यापीठाच्या माध्यमातून नवी मुंबई महानगरपालिकेच्या ऐरोली सेक्टर १५ येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात ह्यडॉ. बाबासाहेब आंबेडकर थॉट्सह्ण या विषयावर पदव्युत्तर पदवीनंतरचा एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम १ जुलैपासून सुरु होत असून यामुळे स्मारकाच्या नावलौकिकात अधिकच भर पडली आहे.

"या स्मारकात सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण, कामगारांचे सबलीकरण, बालकांचे हक्क अशाप्रकारे उपक्रम राबविण्याचे नियोजन केले जात आहे. हा पदविका अभ्यासक्रम हे याच उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने उचललेले एक यशस्वी पाऊल आहे."

**- डॉ. कैलास शिंदे , आयुक्त नवी मुंबई मनपा**

"हा पदविका अभ्यासक्रम ही एक सुरुवात असून यापुढील काळात सामाजिक न्याय, पालीभाषा व अशा प्रकारचे इतरही अभ्यासक्रम याठिकाणी सुरू करण्यात येणार आहेत. लवकरच स्मारकामध्ये मुंबई विद्यापीठाच्या सहयोगाने संशोधन केंद्र सुरू करण्याचा मनोदय आहे."

**- डॉ. रवींद्र कुलकर्णी, कुलगुरू मुंबई विद्यापीठ**

यावप्रसंगी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या विभागप्रमुख उपायुक्त संघरत्ना खिल्लारे, स्मारकाच्या सल्लागार संध्या अंबादे, मुंबई विद्यापीठाचे उपकुलपती प्राचार्य डॉ. अजय भामरे, निबंधक डॉ. प्रकाश कारंडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र मुंबई विद्यापीठाच्या विभागप्रमुख डॉ. मनीषा करणे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# रिपाइं (आठवले) ठामपाच्या १३ जागा लढवणार

## राज्यमंत्री रामदास आठवले यांची माहिती

**■ठाणे :** आगामी ठाणे महानगर पालिका निवडणुकीत रिपाइं आठवले गट हा १३ जागा लढवणार असून तसा प्रस्ताव आपण महायुतीकडे ठेवला असल्याची माहिती केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी गुरुवारी ठाण्यात दिली.

ठाण्यातील अंबिका नगर येथील रिपाइं कार्यकर्ते प्रल्हाद मगरे यांच्या बंधूंचे नुकतेच निधन झाले असून मगरे कुटुंबियांची आठवले यांनी सांत्वनपर भेट घेतली. त्यावेळेस पत्रकारांशी संवाद साधताना रामदास आठवले बोलत होते. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष भास्कर वाघमारे, प्रमोद इंगळे, तात्याराव झेंडे, युवक अध्यक्ष भालेराव, विमल सातपुते, मनिषा करलाद आदी उपस्थित होते.



आठवले म्हणाले की, रिपाइंचे कितीही गट असले तरी आमचा गट प्रबळ आहे. त्यामुळे आम्ही ठाणे पालिकेच्या निवडणुकीत आम्ही प्रबळ दावेदार आहोत. २०१४ मध्ये उद्धव ठाकरे यांनी चुकीची भूमिका घेतली होती. त्यामुळेच त्यांना आता सत्तेच्या बाहेर रहावे लागले आहे. जर ते सोबत असते तर कदाचित भाजप, सेना, रिपाइं युतीला एकहाती बहुमत मिळाले असते. हिंदी भाषेच्या सक्तीबाबत विचारले असता, उद्धव ठाकरे हे हिंदीला विरोध करीत असतील तर ते चुकीचे आहे. देशभर हिंदी भाषा बोलली जात आहे. हिंदी ही राष्ट्रीय भाषा आहे.


जर, हिंदीला विरोध केला जात असेल तर तो संविधानाला विरोध आहे, असे आठवले म्हणाले. समाजकल्याण खात्याचा निधी लाडकी बहीण योजनेला वळविला आहे, याबाबत ते म्हणाले की, निधी वळविला असेल आणि त्यातून शिष्यवृत्ती रखडली असेल तर ते योग्य नाही. कारण, केंद्राने शिष्यवृत्तीसाठी निधी पाठविला आहे. आता राज्य सरकारने समाजकल्याणचा निधी परत करावा, अशी मागणीही आठवले यांनी केली.

# वसई रेल्वे स्थानक परिसरातील वेश्या व्यवसाय महिलांसाठी त्रासदायक

**■विरार :** वसई रोड रेल्वे स्थानक परिसरात वेश्यांच्या वावर वाढला आहे. या वेश्या रस्त्यात उभ्या राहून अश्लिल इशारे करत ग्राहकांना आकर्षित करत असतात,अशा तक्रारी आहेत. वेश्यांमुळे या परिसरात नशेबाज वाढले आहेत. यामुळे येथून ये-जा करणाया सर्वसामान्य महिलांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. खुलेआम सुरू असणाया वेश्या व्यवसायावर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. पश्चिम रेल्वेचे वसई रोड हे महत्वाचे आणि गजबजेलेले रेल्वे स्थानक आहे. स्थानकाच्या पश्चिमेला एसटी महामंडळाचे आगार आहे. येथून दररोज हजारो प्रवासी रेल्वे स्थानकात ये-जा करत असतात. याच रेल्वे स्थानक आणि आगार परिसरात वेश्या उभ्या असतात. संध्याकाळपासून रात्री उशीरापर्यंत या वेश्या ग्राहकांच्या शोधात असतात. अश्लिल हावभाव करत त्या ग्राहकांना आकर्षित करत असतात. त्यामुळे त्यांच्यासाठी येणारे ग्राहक, त्यांचे दलाल, नशेबाज आणि छंदीफंदी लोकांचा राबता असतो. त्याचा त्रास स्थानकात येर्णाया सर्वसामान्य महिलांना होत असतो. वेश्यांकडे आलेले ग्राहक अन्य महिलांकडे वाईट नजरेने बघत असतात. या लोकांमुळे छेडछाडीच्या घटना देखील घडत असतात. महिलांना येथून जाणे असुरक्षित वाटत असते.

### हॅलोजन आणि सीसीटीव्ही कॅमेरे लावणार

बस आगार परिसरात असलेल्या वेश्यांवर मुंबई पोलीस ॲक्ट तसेच भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमाअंतर्गत कारवाई करण्यात येत असते अशी माहिती माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिरालाल जाधव यांनी दिली. येथे आम्ही गस्त वाढविणार आहोत. तसेच प्रकाशासाठी हॅलोजन लावून सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार आहेत. त्यामुळे वेश्यांना येथे उभे राहता येणार नाही, असे जाधव यांनी सांगितले.



दुसरीकडे त्यांच्यामुळे स्थानक परिसरातील पान टर्पया आणि मद्याची विक्री करणारी दुकाने देखील उशिरापर्यंत सुरू असतात. वेश्या आणि मद्यपी ग्राहक यांचा त्रास सर्वसामान्य महिलांना दररोज सहन करावा लागतो. या वेश्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पूर्वी केवळ बस आगार आणि रेल्वे स्थानक परिसरात असलेल्या या वेश्या आता मुख्य रस्त्यावर तसेच आकाशमार्गिका (स्कायवॉक) पर्यंत येऊ लागल्या आहेत. ह्यरात्री दहा ते साडे दहा वाजेपर्यंत बसेससाठी प्रवासी इथे उभे असतात. पण, त्या प्रवाशांना न जुमानता या वेश्या इथे उभ्या राहतात. बस स्टॉप आणि स्कायवॉक आता जणू त्यांचे अड्डेच बनत चालेले आहेत, असे नेहा म्हात्रे या महिला प्रवाशाने सांगितले. संध्याकाळपासून रात्रीपर्यंत या महिला इथेच उभ्या असतात. त्यांच्यामुळे इथून रोज प्रवास करताना खूप असुरक्षित वाटते. पोलिसांनी यात लक्ष घालून कारवाई केली पाहिजे, अशी मागणी प्रवाशी महिलांनी केली आहे.

# रुमाल काढण्यासाठी गेलेला युवक चारशे फुट दरीत कोसळला

**■विरार :** आंबोली येथे वर्षा पर्यटनासाठी आलेला कोल्हापूर येथील युवक ४०० फूट खोल दरीत कोसळला. संबधित तरुण हा कोल्हापूर येथील जिल्हा परिषदचा कर्मचारी असून राजेंद्र बाळासो सनगर (वय ४५, रा. चिले कॉलनी) असे त्यांचे नाव आहे. राजेंद्र हे आपल्या १४ मित्रांसोबत आंबोली कावळेसाद येथे वर्षा पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी आले होते. दरम्यान ही घटना घडल्यानंतर त्या ठिकाणी आंबोली पोलिसांनी धाव घेतली. मात्र दाट धुके असल्यामुळे मदतकार्यात अडचणी आल्या तसेच काळोख पडल्यामुळे ही मोहीम थांबविण्याचा निर्णय घेण्यात आला. उद्या सकाळी रेस्क्यू पथकाच्या मदतीने पुन्हा एकदा राजेंद्र सनगर यांचा शोध घेण्यात येणार आहे, असे पोलिसांकडुन सांगण्यात आले.



याबाबत अधिक माहिती अशी की, कोल्हापुर येथील सनगर ह्या जिल्हा परिषदेत कनिष्ठ सहाय्यक म्हणून कार्यरत आहेत. शुक्रवारी (२७ जून) ते आपल्या मित्रांसोबत पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी कावळेसाद येथे आले होते. सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास राजेंद्र सनगर हे दरीतून उलट्या बाजूने येणाऱ्या पाण्यात रुमाल उडविण्याचा आनंद घेत होते. मात्र त्याचवेळी त्यांचा रुमाल दरीच्या तोंडावर पडला. त्यामुळे रुमाल आणण्यासाठी राजेंद्र सनगर गेले. मात्र संबंधित जागा निसरडी असल्यामुळे ते थेट दरीत कोसळले. हा प्रकार इतका भयानक होता की, कोणाच्या काहीच लक्षात आले नाही.

राजेंद्र सनगर दरीत कोसळल्याचे लक्षात येताच यांच्या मित्रांनी आरडाओरड केला आणि घडलेली घटना त्या ठिकाणी असलेल्या स्टॉल चालकांना सागितली. त्यानंतर स्टॉल चालकांनी याबाबतची माहिती गेळे सरपंच सागर ढोकरे यांना दिली. त्यानुसार ढोकरे यांनी पोलिसांना पाचारण केले. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि ग्रामस्थांच्या मदतीने शोधकार्यास सुरुवात केली. मात्र दरीत दाट धुके असल्यामुळे मोहीम अर्ध्यावरच थांबवावी लागली. उद्या सकाळी ही मोहीम पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

# आई-मुलाच्या डोक्यावर धरले पिस्तूल, पुण्यात सराईत गुंडांचा पुन्हा हैदोस

**■डहाणू :** पुण्यातील सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याच्या दाट लोकवस्तीच्या खानापूर येथे सराईत गुंडांनी हातात दोन गावठी पिस्तूल आणि कोयते घेऊन हैदोस घातला. रिक्षा, कार, टेम्पो, मोटरसायकल आदी १४- १५ वाहनांची तोडफोड केली. प्रसाद महादेव जावळकर याच्या घरात शिरुन आई भारती जावळकर आणि प्रसाद यांच्या डोक्यावर पिस्तूल धरले आणि त्यांना ठार मारण्याची धमकी दिली तसेच घरातील टीव्ही आणि इतर मालमत्तेचे नुकसान केले. हा प्रकार काल मंगळवारी (२४) रोजी रात्री साडे नऊ आणि बुधवारी (२५) पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास घडला.

या घटनेने खानापूर गावांसह सिंहगड पानशेत भागात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तक्रारीनंतर हवेली पोलिसांनी प्रणव उर्फ चिक्या रणधीर, तन्मय उर्फ पिनुड्या तानाजी धीवार, अथर्व उर्फ झिंग्या दिलीप गायकवाड, आयुष उर्फ लाल्या प्रविण सोनवणे, आदित्य पोपट जाधव (सर्व राहणार खानापुर, ता. हवेली) यांच्यासह १५ जणांविरोधात भादंवि १०९, ३३३ आदी कलमाखाली सशस्त्र प्राणघातक हल्ला, बेकायदा जमाव जमवून मालमत्तेचे नुकसान, दहशत माजवणे असा गुन्हा दाखल केला आहे.



### पोलिसांकडून शोध मोहिम

वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन वांगडे म्हणाले, किरकोळ कारणावरून सराईत गुंडानी घरावर तसेच गावातील वाहनांवर हल्ला करून तोडफोड केली. तसेच गावठी पिस्तूल , कोयते अशी प्राणघातक शस्त्रे घेऊन हैदोस घातला या प्रकरणी हल्लेखोरांचा शोध सुरु आहे. या प्रकरणी हवेली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांच्या देखरेखीखाली पोलीस उपनिरीक्षक शितल टेंबे, पोलिस अंमलदार संतोष तोडकर , संतोष भापकर यांचे पथक तपास करत आहेत.

या बाबत हवेली पोलीसांनी सांगितले की, खानापूर गावातील दिलशान अली यांच्या सलून दुकानाच प्रसाद जावळकर याने माझा मित्र विकास सोपान जावळकर याला तुज्या सोबत यायचे नसताना त्याला तू जबरदस्ती का करतो असा जाब हल्लेखोर प्रणव रणधीर याला जाब विचारला. त्यावेळी मानव पोपट जाधव याने विकास जावळकर याला जिवे मारण्याची धमकी दिली. नंतर प्रणय रणधीर आणि त्याच्या साथीदारांनी प्रसाद, विकास जावळकर आणि रोहित राजू जावळकर यांना शिवीगाळ करत दमदाटी दिली . त्यावेळी प्रणव रणधीर याने तन्मय धिवार याच्या कमरेचे गावठी पिस्तुल हातात घेतेले आणि गोळी मारुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी प्रसंगधावतेने प्रसाद जावळकर हा तिथून पळून गेला. नंतर त्याने हवेली पोलीस ठाण्यात प्रणव रणधीर त्याच्या साथीदारांविरोधात फिर्याद दाखल केली.

प्रसाद हा पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यासाठी गेल्याने चिडून जाऊन प्रणव रणवीर आणि त्याच्या साथीदारांनी नंतर आज पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास प्रसाद जावळकर याच्या घरात शिरुन जोरदार हल्ला केला. त्यात घरातील टीव्हीसह प्रापंचिक मालमत्तेचे तोडफोड करत नुकसान केले.

त्यावेळी प्रसाद याची आई भारती जावळकर ही साहित्य वाचवण्यासाठी पुढे गेली असता तिच्या डोळ्यावर पिस्तूल धरत प्रणव रणधीर याने तुज्या मुलाने पोलीसांत आमच्या विरोधात तक्रार दिली तर तुमच्या सर्व घरादाराला जिवे ठार मारू अशी धमकी दिली. जोरदार आरडाओरडा ऐकून गावातील प्रसाद याच्या घरासमोर जमाव जमला. त्यावेळी हातात पिस्तूल, कोयते घेऊन हल्लेखोरांनी घरासमोर उभ्या असलेल्या गाड्याची तसेच भैरवनाथ मंदिर आणि सरकारी दवाखान्याजवळील वाहनांची तोडफोड करत मध्यरात्री पासून पहाटे पर्यंत दहशत निर्माण केली. आमच्या नादाला कोण लागले तर त्याला जिवे ठार मारू अशी धमकी देत हल्लेखोर पसार झाले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००0१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com